


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २८.०७.२०२६ | अंक नं. १०१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020













# गंज बाजारातील अतिक्रमणे हटविली; महापालिकेची मोठी कारवाई

नगर – शहरातील सर्वाधिक मोठी बाजारपेठ असलेल्या गंज बाजार परिसरातील अतिक्रमणे महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण निर्मूलन विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ यांच्या पथकाने सोमवारी दुपारनंतर काढून टाकली. रस्त्याला अडथळा ठरणारी अतिक्रमण काढून टाकत साहित्य जप्त केले.

शहरातील गंज बाजार, कापड बाजार, मोची गल्ली, घास गल्ली, सराफ बाजार परिसरातील अतिक्रमणांचा प्रश्न गेली अनेक दिवसांपासून कायम आहे. महापालिकेच्या पथकाने कारवाई केल्यानंतर दुसऱ्या क्षणाला पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण होते. अतिक्रमणांमुळे स्थानिक व्यापारी व ग्राहकांनाही मोठा त्रास सहन करावा लागतो. या अतिक्रमणधारकांना वारंवार सांगूनही, कारवाई करूनही जर गांभीर्य नसेल तर प्रशासनाने यांच्यावर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी व्यावसायिक, नागरिकांनी केली आहे.

या बाजारपेठांमध्ये पाही चालणेही अवघड होते. गंज बाजार परिसरात शहरातील सर्वाधिक मोठी सराफ पेठ आहे. त्यामुळे येथे जिल्ह्यासह जिल्हा बाहेरूनही ग्राहक खरेदीसाठी येतात. अतिक्रमणांमुळे मात्र या बाजारात वाहने तर सोडा ग्राहकांना पायी चालणे ही मुश्किल होते. त्यामुळे येथील अतिक्रमण हटवावीत, अशी मागणी सराफ असोसिएशन गेली अनेक वर्षांपासून करत आहे. शहरातील मुख्य बाजारपेठ सुरळीत चालवावी यासाठी अतिक्रमण विरोधी मोहिमेत सातत्य ठेवले जाणार असल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले आहे. तसेच गंज बाजारातील पोलीस चौकी ही गेल्या अनेक दिवसांपासून बंद पडली आहे. ही पोलीस चौकी कोतवाली पोलीस निरीक्षक यांनी जातीने लक्ष घालून सुरु करावी तसेच या परिसरातील वाहनांचा प्रश्न अतिक्रमणांचा प्रश्न यात लक्ष घालून कारवाई करावी, अशी मागणीही नागरिकांमधून होत आहे.


शहरातील गंज बाजार येथे अतिक्रमणधारकांवर कारवाई करताना महापालिकेचे पथक. शेजारील छायाचित्रात अतिक्रमण काढल्यानंतर गंज बाजारचा १५ फुटाचा रस्ता भव्य दिसू लागला. (छाया – धनेश कटारिया)

## इन्स्टाग्रामवर चाईल्ड पोर्नोग्राफी व्हिडीओ प्रसारित करणाऱ्या संशयितावर गुन्हा दाखल

नगर –सोशल मीडियाचा गैरवापर करून लहान मुलांच्या शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह व बेकायदेशीर चित्रीकरण प्रसारित केल्याप्रकरणी अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात एका संशयितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर टिपलाईन अहवालावरून मिळालेल्या तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे ही धडक कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी अनिकेत गोफाणे याने आपल्या इन्स्टाग्राम व मेसेंजर खात्यावरून लहान मुलांच्या शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह व्हिडीओ आणि फोटो इंटरनेटवर प्रसिद्ध केले होते. इंटरनेटवर असा बेकायदेशीर मजकूर पसरवला जात असल्याचे तांत्रिक तपासात स्पष्ट झाले.

याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार आप्पासाहेब सुनील हिंगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी अनिकेत गोफाणे याच्याविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या कलम ६७ (बी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी तथा पोलीस निरीक्षक सागर ढिकले हे करत आहेत. सोशल मीडियाचा गैरवापर करून बाल शोषणाशी संबंधित साहित्य पसरवणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## 'नीट' पेपरफुटी प्रकरणातील आंदोलक विद्यार्थ्यांना 'सुप्रिम कोर्टाचा दिलासा'

नवी दिल्ली – नीट–यूजी पेपर लीक प्रकरणी झालेल्या विद्यार्थी आंदोलन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं आंदोलकांना मोठा दिलासा दिला आहे. ज्या आंदोलकांची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही, त्यांच्या विरोधात कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई व्हायला नको, असे न्यायालयाने म्हटले आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेल्या आंदोलकांची सुटका करा, असे स्पष्ट आदेश न्यायालयाने दिले आहेत. विरोध–आंदोलन हे लोकशाहीची अभिन्न भाग आहेत, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. देशभरात विद्यार्थी आंदोलनांच्या दरम्यान झालेल्या घटनांची निष्पक्ष आणि स्वतंत्र चौकशी करण्याची आवश्यकता न्यायालयाने बोलून दाखवली. आंदोलनादरम्यान अतिरिक्त बळाचा वापर झाला असल्यास, नियमांचे उल्लंघन झाले असल्यास त्याबद्दलची जबाबदारी निश्चित व्हायला हवी, असे न्यायालयाने म्हटले.







जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# आरोपींचा जमीन अर्ज फेटाळला : २८ लाखांची वसुली अन् हत्यारे जप्त करण्यासाठी अटक करण्याची मागणी

नगर - तोफखाना पोलीस ठाण्यात नोंद असलेल्या गुन्ह्यातील आरोपींचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला असून, गुन्ह्यातील २८ लाख रुपये आणि हत्यारे जप्त करण्यासाठी आरोपींना तात्काळ अटक करावी, अशी मागणी फिर्यादी नितीन भगवानराव दीपके यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक आणि तोफखाना पोलिसांकडे केली आहे.

फिर्यादी नितीन दीपके (रा. सारसनगर, अहिल्यानगर) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या आरोपींनी नगर येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, या अर्जावर सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायालयाने आरोपींचा जामीन फेटाळून लावला. आरोपींकडून गुन्ह्यातील २८ लाख रुपये वसूल करणे आणि गुन्ह्यात वापरलेली हत्यारे जप्त करणे अद्याप बाकी आहे. त्यामुळे या प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी आरोपींना पोलिसांच्या ताब्यात घेऊन कोठडीत चौकशी करणे अत्यंत गरजेचे आहे, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

न्यायालयाच्या या निर्णयानंतर फिर्यादी नितीन दीपके यांनी थेट पोलीस अधीक्षक कार्यालयात अर्ज सादर केला आहे. न्यायालयाने नोंदवलेल्या निरीक्षणाचा आधार घेत तोफखाना पोलिसांनी वेळ न घालवता आरोपींना तात्काळ अटक करावी, अशी विनंती त्यांनी पत्राद्वारे केली आहे. आता पोलीस या प्रकरणात काय कारवाई करतात आणि आरोपींच्या मुसक्या कधी आवळतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शहरातील धार्मिक स्थळांवरील कारवाईच्या नोटिसीला स्थगिती द्या

**समाजवादी पार्टीचे आ. आझमी यांचे उपमुख्यमंत्री शिंदे यांना निवेदन**

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेने रस्त्यांना अडथळा ठरणाऱ्या धार्मिक स्थळांबाबत प्रसिद्ध केलेल्या अवघ्या सात दिवसांच्या मुदतीच्या नोटिसीला तात्काळ स्थगिती देण्यात यावी, संबंधित धार्मिक संस्था व विश्वस्तांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्यासाठी किमान दोन ते तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी तसेच कायदेशीर व अधिकृत धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्यात यावे, अशी मागणी समाजवादी पार्टीच्या वतीने आमदार अबू आझमी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत समाजवादी पार्टीचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष आबिद हुसेन यांनी आमदार अबू आझमी यांच्याशी सविस्तर चर्चा करून शहरातील परिस्थितीची माहिती दिली. त्यानंतर आमदार आझमी यांनी हा विषय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून देत, महापालिकेकडून सुरू असलेल्या कारवाईबाबत तातडीने लक्ष घालण्याची विनंती केली असल्याचे आबिद हुसेन यांनी सांगितले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देवून चर्चा करताना आमदार अबु आझमी.

अहिल्यानगर महानगरपालिकेने नुकतीच शहरातील रस्त्यांना अडथळा ठरणाऱ्या मंदिर, दर्गा, मजार, चर्च, गुरुद्वारा, कबर आदी धार्मिक वास्तूंना स्वतःहून हटविणे अथवा स्थलांतरित करण्यासाठी सात दिवसांची मुदत देणारी सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध केली आहे. संबंधित मुदतीत कार्यवाही न झाल्यास अशा वास्तूंना बेकायदेशीर अतिक्रमण समजून महापालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात येईल, असा इशाराही नोटिसीत देण्यात आला आहे.

आमदार अबू आझमी यांनी उपमुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, महापालिका प्रशासनाने कोणतीही एकतर्फी कारवाई करण्याऐवजी संबंधित धार्मिक स्थळांच्या विश्वस्तांना चर्चेसाठी बोलवावे. रस्त्याच्या विकासासाठी स्थलांतर आवश्यक असल्यास संबंधित संस्थांना पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सकारात्मक भूमिका घ्यावी. तसेच प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्रपणे तपासणी करून योग्य तो निर्णय घ्यावा. याशिवाय, १९४७ पूर्वी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही धार्मिक स्थळांवर कारवाई करू नये, अशी स्पष्ट भूमिका आमदार आझमी यांनी मांडली आहे.

कोणत्याही धार्मिक स्थळावर कारवाई करण्यापूर्वी संबंधितांना पुरेशी सुनावणीची संधी द्यावी, त्यांच्या म्हणण्याची दखल घ्यावी आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी. अन्यथा सामाजिक सलोखा, धार्मिक सौहार्द आणि शांततेवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात वैयक्तिक हस्तक्षेप करून अहिल्यानगर महानगरपालिका प्रशासनाला योग्य त्या सूचना द्याव्यात, सात दिवसांच्या नोटिसीवरील कारवाई तात्पुरती स्थगित करावी, मुदतवाढ जाहीर करावी आणि कायदेशीर तसेच अधिकृत धार्मिक स्थळांचे संरक्षण सुनिश्चित करावे, अशी मागणी समाजवादी पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे.

# महिला उद्योजिकांसाठी आनंदनगरी खरेदी महोत्सव
## बचत गट, गृहउद्योगांसाठी ७, ८ ऑगस्टला प्रदर्शन

नगर - स्थानिक महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, महिला गृहउद्योगांना चालना मिळवून देणे तसेच 'व्होकल फॉर लोकल' या संकल्पनेला बळकटी देण्याच्या उद्देशाने राधेय महिला गृह उद्योग यांच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त आनंद नगरी खरेदी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवामध्ये महिला बचत गट, गृहउद्योग चालविणाऱ्या महिला तसेच स्थानिक महिला व्यावसायिकांना आपले विविध प्रकारचे स्टॉल उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

हा दोन दिवसीय खरेदी महोत्सव ७ आणि ८ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते रात्री १० या वेळेत जैन स्थानक, शिवगंगा टॉवरजवळ, मार्केटयार्ड, सारसनगर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रदर्शनामध्ये शहरातील नागरिकांसाठी विविध प्रकारची उत्पादने आणि खाद्यपदार्थ एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

या महोत्सवात कपडे, ज्वेलरी, हस्तकला वस्तू, ब्युटी प्रॉडक्ट्स, गेम स्टॉल्स तसेच विविध स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल आकर्षणाचे केंद्र ठरणार आहेत. घरगुती व्यवसाय करणाऱ्या महिलांना आपल्या उत्पादनांचे थेट ग्राहकांपर्यंत घेऊन जाण्याची आणि नवीन ग्राहकांशी संपर्क वाढविण्याची संधी या प्रदर्शनातून मिळणार आहे.

महोत्सवादरम्यान महिलांसाठी सोडत पद्धतीने आकर्षक बक्षिसांचे आयोजन करण्यात आले असून त्यामुळे खरेदीसोबतच मनोरंजनाचीही पर्वणी अनुभवता येणार आहे. यावेळी आयोजक उज्वला मालू आणि स्वाती नागोरी यांनी नागरिकांना ऑनलाईन खरेदीपेक्षा स्थानिक व्यवसायिकांकडून ऑफलाईन खरेदीला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले. स्थानिक व्यावसायिक आणि महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना प्रोत्साहन मिळाल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि अनेक महिलांना स्वावलंबी होण्यासाठी नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या महोत्सवात स्टॉल उभारण्यास इच्छुक महिला बचत गट, गृहउद्योग चालविणाऱ्या महिला तसेच व्यावसायिकांनी अधिक माहितीसाठी उज्वला मालू (७०२०३५२८१२) किंवा स्वाती नागोरी (९६५७९११०६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# १३ ऑगस्टपासून लाळखुरकूत प्रतिबंधक लसीकरण मोहीम

नगर - राज्यातील पशुधनाला लाळखुरकूत (एफएमडी) या घातक विषाणूजन्य रोगापासून संरक्षण मिळावे, यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत १३ ऑगस्ट पासून राज्यभर लाळखुरकूत रोगप्रतिबंधक लसीकरण मोहिमेची सुरुवात करण्यात येणार आहे. या मोहिमेत सर्व पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे शंभर टक्के लसीकरण करून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

या मोहिमेसाठी केंद्र शासनाकडून राज्याला उपलब्ध झालेल्या एक कोटी लसमात्रांचे वितरण आयव्हीबीपी संस्थेमार्फत करण्यात येत आहे. लसीकरण सुरू होण्यापूर्वी सर्व जिल्ह्यांपर्यंत लसींचा पुरेसा साठा वेळेत पोहोचावा, यासाठी शीत साखळीची आवश्यक खबरदारी घेऊन लसींचा पुरवठा केला जात आहे. त्यामुळे राज्यातील कोट्यवधी पशुधनाला लाळखुरकूत रोगापासून संरक्षण मिळण्यास मदत होणार असून पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. लसीकरण अधिक परिणामकारक होण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पशुधनाचे जंतनिर्मूलन करण्यात येत असून आवश्यक औषधांचा पुरवठाही संबंधित संस्थांना करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत सर्व खासगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांनी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत पशुधनाचे लसीकरण करून त्याची नोंद एनडीएलएम प्रणालीवर केल्यास प्रति पशुधन पाच रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.

राज्यातील पशुधन रोगांपासून सुरक्षित ठेवणे आणि पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळणे, या उद्देशाने ही मोहीम राज्यातील सर्व जिल्ह्यांत व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. पशुवैद्यकीय सेवांसाठी पशुपालकांनी १९६२ या टोल-फ्री क्रमांकावर अथवा ९०६३१४२२९९ या व्हॉट्सप चॅटबॉट सेवेवर संपर्क साधावा, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

# कारगिल विजय दिनानिमित्त अभाविपकडून शहीद जवानांना श्रद्धांजली

नगर - अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) अहिल्यानगर महानगरच्यावतीने दिल्ली गेट येथे भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून कारगिल युद्धात शहीद झालेल्या भारतीय सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करत कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कारगिल युद्धाचे महत्त्व विद्यार्थ्यांना तसेच उपस्थित नागरिकांना समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मनात भारतीय सैन्याबद्दल आदर, अभिमान आणि राष्ट्रभक्तीची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने अभाविपच्या अहिल्यानगर महानगर शाखेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



कारगिल विजय दिनानिमित्त अभाविपकडून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

अभाविपचे अहिल्यानगर महानगरमंत्री उत्कर्ष परदेशी म्हणाले, दिल्ली येथील जंतर-मंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेला भारतीय सैन्याचा अपमान अत्यंत लाजिरवाणा आहे.

या कार्यक्रमाला अहिल्यानगर शहरातील निवृत्त कर्नल नीळकंठ उल्हारे, अभाविप अहिल्यानगर विभाग संयोजक आनंद गांधी, महानगरमंत्री उत्कर्ष परदेशी, महानगर सहमंत्री शर्वरी क्षीरसागर तसेच अन्य विद्यार्थी कार्यकर्ते उपस्थित होते.

# थकलेले घरभाडे मागितल्याचा रागातून महिलेला दिली जीवे मारण्याची धमकी

नगर - अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर दर्गा दायरा रोड परिसरातील संजोगनगर येथे घरभाड्याच्या वादातून एका महिलेला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत राजश्री नंदकुमार गोड (रा. संजोगनगर, दर्गा दायरा रोड, मुकुंदनगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या मालकीच्या घरात आरोपी इरफान शेख आणि नसरीन शेख हे दोघे भाड्याने राहत आहेत. गेल्या काही काळापासून त्यांच्याकडून घरभाड्याची रक्कम थकली होती. त्यामुळे फिर्यादी राजश्री गोड या आरोपींकडे थकलेले पैसे मागण्यासाठी गेल्या होत्या. थकीत भाडे मागितले असता आरोपींनी, आम्ही तुम्हाला पैसे दिले आहेत, आता आम्ही कोणतेही पैसे देणार नाही असे सांगून वाद घालण्यास सुरुवात केली. त्यानंतर दोन्ही आरोपींनी फिर्यादी राजश्री गोड यांना शिवीगाळ करत दमदाटी केली. तसेच, यापुढे पुन्हा पैसे मागण्यासाठी आलीस तर तुला थेट जीवे मारून टाकीन अशी धमकी दिली.

# नगरमध्ये १ व २ ऑगस्टला शालेय वैज्ञानिक प्रदर्शन व स्पर्धा

**रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊन व जे. जे. सायन्स अकॅडमीचा उपक्रम**

नगर - रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊन आणि जे.जे. सायन्स अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय यंग इनोव्हेस्टर्स सायन्स एक्झिबिशन व स्पर्धेचे आयोजन १ व २ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे. मनमाड रस्त्यावरील संजोग लॉन्स येथे सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत ही स्पर्धा व विज्ञान प्रदर्शन होणार असल्याची माहिती रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊनचे अध्यक्ष अ‍ॅड. हेमंत कराळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

इयत्ता आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि नवोपक्रमक्षमतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी शहरासह ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांचाही या उपक्रमात सहभाग असून, सुमारे ७० शाळांमधील ३०० विद्यार्थी स्पर्धेत सहभागी होणार आहेत.



यंग इनोव्हेस्टर्स सायन्स एक्झिबिशन व स्पर्धेच्या पोस्टरचे अनावरण करताना अ‍ॅड. हेमंत कराळे, दीपा मंत्री, मर्लिन एलिशा, डॉ. प्रकाश गरुड, डॉ. पद्मजा गरुड, डॉ. योगेश गरुड आदी.

जे. जे. सायन्स अकॅडमीच्या दीपा मंत्री यांनी सांगितले की, स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. प्रथम क्रमांकासाठी ३० हजार रुपये, द्वितीय क्रमांकासाठी २० हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी १० हजार रुपये, ट्रॉफी तसेच इतर अनेक बक्षिसे देण्यात येणार आहेत. जास्तीत जास्त शाळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.


उपक्रम प्रमुख मर्लिन एलिशा यांनी सांगितले की, स्पर्धेचे परीक्षण मुंबई येथील भाभा परमाणु अनुसंधान केंद्राचे माजी न्यूक्लिअर मेडिसीन शास्त्रज्ञ डॉ. राजशेखरराव बोक्का, माजी प्राचार्य डॉ. भास्करराव झावरे आणि माजी उपप्राचार्य डॉ. बाळासाहेब गायकर हे करणार आहेत. स्पर्धेतील सहभाग मर्यादित असून प्रथम नावनोंदणी करून गूगल फॉर्म भरणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी ९०२२९०१६२७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

क्लबचे सचिव मधुर बागायत यांनी आभार मानले. यावेळी यंग इनोव्हेस्टर्स सायन्स एक्झिबिशन व स्पर्धेच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले.

पत्रकार परिषदेला गरुड कॅन्सर हॉस्पिटलचे डॉ. प्रकाश गरुड, डॉ. पद्मजा गरुड, डॉ. योगेश गरुड, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊनचे सदस्य महेश गोपालकृष्णन, प्रतापसिंग पांडये, अ‍ॅड. वैशाली कराळे, मॉरिस पारधे आदी उपस्थित होते. या स्पर्धेसाठी गरुड कॅन्सर हॉस्पिटल हे मुख्य प्रायोजक, तर मिडास सुझुकी हे सहप्रायोजक आहेत.

# अशोक भागवाणी यांचे अल्प आजाराने निधन

नगर - माणिक चौक व सावेडी येथील 'मराठा सायकल सेटर' या फर्मचे संचालक गोपाल व प्रितम यांचे वडील अशोक प्रभुदास भागवाणी (वय ८०) यांचे शनिवारी दुपारी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ विवाहित मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# मच्छिंद्र तोडमल यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - जलतरण तलाव जवळील वॉर्ड नं.३ येथील रहिवासी अंबिका मोटर्सचे मालक मच्छिंद्र सखाराम तोडमल (वय ७१) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २८ जुलै रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, दोन मुले, सूना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. ते ट्रॅक्टर मेकॅनिक गोरक्षनाथ तोडमल यांचे मोठे बंधू तर केबल ऑपरेटर नितीन व निलेश तोडमल यांचे वडील, राहुल, संदीप व सुरज तोडमल यांचे काका होत.

# राजेंद्र शिरसाठ यांचे हृदयविकाराने निधन

श्रीरामपूर - येथील जलतरण तलाव जवळील वॉर्ड नं.३ येथील रहिवासी राजेंद्र शिवराम शिरसाठ (वय ५४) यांचे २७ जुलै रोजी नाशिक येथे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २८ जुलै रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या पश्चात आई, पत्नी, भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, सून, चुलत बंधू, जावई, नातू असा परिवार आहे. राजेंद्र फर्निचरचे मालक किशोर शिरसाठ यांचे थोरले बंधू, धनंजय शिरसाठ यांचे वडील तर गणेश, अभिजीत, पंकज, रंगनाथ व सोमनाथ शिरसाठ यांचे चुलत बंधू होत.

# राष्ट्रवादीच्या माजी शहर जिल्हाध्यक्षा नलिनी गायकवाड यांचा शिवसेनेत प्रवेश

नगर - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असलेल्या आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) महिला आघाडीच्या माजी शहर जिल्हाध्यक्षा नलिनी गायकवाड यांनी २८ जुलै रोजी ठाकरे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यावेळी शिवसेना महानगर प्रमुख किरण काळे, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, उपशहर प्रमुख सुनील भोसले, युवा सेना जिल्हाप्रमुख निलेश खोडदे, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे, केडगाव शिवसेनेचे प्रतीक बारसे, राम वाणी, राम झिने, महिला आघाडीच्या उषा भगत, शैला लांडे, रजनी ताठे, संतोष घरवाढवे, विकेश गुंदेचा, सागर चाबुकस्वार, चंद्रकांत उजागरे, शंकर आव्हाड, गणेश आपरे, राम धोत्रे, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, विजय शिरसाट, महावीर मुथा, किशोर कोतकर, आप्पा लांडगे, बाबासाहेब वैरागर, जयराम आखाडे, सुमित चव्हाण आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना किरण काळे म्हणाले, ही तर सुरुवात असून आगामी काळात अनेक कार्यकर्ते ठाकरे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. नलिनी गायकवाड यांच्यासारख्या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या महिला नेत्या शिवसेनेत आल्याचा विशेष आनंद आहे. गायकवाड यांनी गेल्या अनेक वर्षांपासून शहर व जिल्ह्यातील महिलांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष केला आहे. महिलांच्या मदतीसाठी त्या नेहमीच धावून जातात. समाजसेवा हा त्यांचा स्थायीभाव असून त्यांचा महिलांशी दांडगा जनसंपर्क आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्या दक्षता समितीच्या माध्यमातून महिलांसाठी काम करत आहेत.



नलिनी गायकवाड यांचे ठाकरे शिवसेनेत स्वागत करताना महानगरप्रमुख किरण काळे, पक्षाचे पदाधिकारी आदी.



औसरकर मळा येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या वतीने पारंपरिक पायी दिंडी काढण्यात आली.

# औसरकर मळा येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात भक्तिमय दिंडी सोहळा उत्साहात

नगर - आषाढी एकादशीनिमित्त औसरकर मळा येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या वतीने पारंपरिक पायी दिंडी सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. मंदिरात पहाटेपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली होती. राम कृष्ण हरी, ज्ञानोबा-तुकारामच्या अखंड जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे काकडा भजन व महाआरतीने झाली. त्यानंतर भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत हरिनामाचा गजर करत भक्तिभाव व्यक्त केला. दुपारी श्री विठ्ठल-रुक्मिणी महिला भजनी मंडळाच्या सहभागाने रंगलेल्या भजन कार्यक्रमाने वातावरण अधिकच भक्तिमय झाले. पारंपरिक पांढऱ्या साड्यांमध्ये सहभागी झालेल्या महिलांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली. यानंतर मंदिरातून भव्य पायी दिंडीला प्रारंभ झाला. गौरवनगर, चिपाडे मळा, ओम कॉलनी, औसरकर मळा आणि नानाजीनगर या मार्गाने दिंडीची भक्तिमय मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदंगाच्या गजरात, अभंग आणि हरिनामाच्या घोषात शेकडो वारकरी, महिला, पुरुष तसेच तरुण वर्ग मोठ्या उत्साहाने सहभागी झाला. परिसरातील नागरिकांनीही या दिंडी सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वारकऱ्यांचे स्वागत केले. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी या भक्तिमय सोहळ्याचा आनंद घेतल्याने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

यावेळी माजी नगरसेविका शितलताई जगताप यांनीही श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेत दिंडी सोहळ्यास उपस्थिती दर्शविली. त्यांनी उपस्थित भाविकांना आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देत सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी श्री विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना केली. दिंडी मंदिरात परतल्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणीची महाआरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर, श्री विठ्ठल-रुक्मिणी महिला भजनी मंडळाच्या अनिता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री विठ्ठल-रुक्मिणी युवा प्रतिष्ठान यांनी या दिंडी सोहळ्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्याचा पाया

पाणी आणि आहार हे शरीराला मिळणारे सर्वात महत्त्वाचे इंधन आहे. प्राचीन काळापासून आयुर्वेदात याला 'जीवनाचे मूळ' मानले जाते आणि आता आधुनिक विज्ञानानेही याला 'निरोगी जीवनाची गुरुकिल्ली' चा दर्जा दिला आहे. पाणी, हिरव्या पालेभाज्या, फळे, कडधान्ये आणि संपूर्ण धान्य यांनी समृद्ध असलेला आहार शरीराला आवश्यक ऊर्जा देतो. यातील खास 'पाणी' नावाचा घटक शरीरातील रक्ताभिसरण सुधारतो, शरीरातील विषारी घटक बाहेर टाकतो आणि शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करतो. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पाणी आणि संतुलित आहार रामबाण आहे कारण एका ग्लास पाण्यातून आणि योग्य आहारातून दिवसभराची शरीराची गरज जवळपास पूर्ण होते .वजन नियंत्रित करू इच्छिणाऱ्यांसाठी हा आहार उत्तम आहे, कारण यात कॅलरीज कमी आणि पोषक घटकांचे प्रमाण जास्त असते. फायबरमुळे पचनक्रिया चांगली होते तर अँटिऑक्सिडंट्स हृदयविकार, मधुमेह व कॅन्सरसारख्या आजारांपासून बचाव करतात. उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी, त्वचा तजेलदार ठेवण्यासाठी आणि मेंदूच्या कार्यासाठीही पाणी आणि योग्य आहाराचा उपयोग होतो. आयुर्वेदात पाण्याला 'संजीवनी' व संतुलित आहाराला 'औषध' मानले आहे. साधे-सरळ अन्न, वेळेवर जेवण आणि पुरेसे पाणी पिल्यामुळे आपण अनेक आजार टाळू शकतो. महागड्या सप्लिमेंट्सपेक्षा पाणी आणि घरगुती संतुलित आहार सहज, स्वस्त आणि आपल्या मातीतला असल्याने अधिक गुणकारी ठरतो.

## पाककला

### मसाला तिखट मिरची फ्राय

**साहित्य :** हिरवी तिखट मिरची १०, बेसन २ चमचे, तांदळाचे पीठ १ चमचा, जिरे १/२ चमचा, हळद १/४ चमचा, हिंग १ चिमूट, तिखट १ चमचा, मीठ चवीनुसार, तेल २ चमचे, लिंबाचा रस १ चमचा, बारीक चिरलेली कोथिंबीर १ चमचा

**कृती :** मिरच्या धुवून मधोमध उभ्या चिरा. आतल्या बिया काढून टाका. एका बाऊलमध्ये बेसन, तांदळाचे पीठ, हळद, तिखट, मीठ आणि थोडे पाणी घालून घट्ट मिश्रण तयार करा. कढईत तेल गरम करा. त्यात जिरे आणि हिंगाची फोडणी द्या. त्यात मिरच्या घालून २ मिनिटे परतून घ्या. आता तयार केलेले बेसनाचे मिश्रण मिरच्यांवर टाका आणि झाकण ठेवून ५ मिनिटे वाफेवर शिजवा. झाकण काढून वरून कुरकुरीत होईपर्यंत परता. गॅस बंद करून वरून लिंबाचा रस आणि कोथिंबीर घाला. गरम गरम मसाला तिखट मिरची भाकरी किंवा डाळ-भाताबरोबर सर्व्ह करा.

## वास्तू

### बाथरूमसाठी रंग

* बाथरूमसाठी पांढरा, आकाशी किंवा हलका हिरवा रंग शुभ आहे.
* टूथब्रश, साबणदाणी आणि इतर सामान नीटनेटकं ठेवावं.
* बाथरूममध्ये औषधं, पैसे किंवा महत्त्वाचे कागद ठेवू नयेत.
* एकदा बाथरूममध्ये खडेमीठाचे पाणी शिंपडावे. याने नकारात्मक ऊर्जा निघून जाते. आणि झोपण्यापूर्वी कमोडचे झाकण बंद करून ठेवावे.

## सौंदर्य

शॅम्पूचं काम म्हणजे केसांमधली घाण काढणे. पण यासाठी शॅम्पूमध्ये असणारे घटक केसांचा नैसर्गिक तेलाचा थर काढून टाकतात. यालाच आपण केस खडखडीत झाले असं म्हणतो. इथेच कंडिशनर कामाला येतो. शॅम्पूने निघून गेलेला ओलावा कंडिशनर परत भरतो.

## सल्ला

आठवड्यातून एकदा बाथरूमच्या कोपऱ्यात बेकिंग सोडा आणि व्हिनेगर शिंपडल्याने घाण वास निघून जातो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २९ जुलै २०२६

**गुरुपौर्णिमा, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, उ.षा.१५।३७, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०६ वा. ६ मि.**

## राशिभविष्य

**मेष** – कामात नवीन संधी मिळतील. सहकारी मदत करतील. आरोग्य स्थिर राहील.

**वृषभ** – आर्थिक परिस्थिती सुधारेल. घरात आनंदाचे वातावरण. जुन्या गुंतवणुकीतून फायदा.

**मिथुन** – विद्यार्थ्यांना यश मिळेल. नवीन ओळखी होतील. प्रवासात काळजी घ्या.

**कर्क** – कुटुंबासोबत चांगला वेळ जाईल. मन प्रसन्न राहील. अनावश्यक खर्च वाढू शकतो.

**सिंह** – नोकरीत मान-सन्मान वाढेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल. तब्येत चांगली राहील.

**कन्या** – नवीन कामाची सुरुवात होईल. भागीदारीत लाभ. मानसिक शांतता मिळेल.

**तूळ** – जोडीदारासोबत संबंध सुधारतील. सामाजिक क्षेत्रात नाव होईल. आर्थिक व्यवहार सांभाळा.

**वृश्चिक** – अडचणी दूर होतील. धार्मिक कार्यात मन लागेल. वाहन चालवताना सावध रहा.


**धनु** – सर्जनशीलतेला वाव मिळेल. मुलांकडून चांगली बातमी. सकारात्मक विचार ठेवा.

**मकर** – घर-बांधकामाचे प्रश्न मार्गी लागतील. कौटुंबिक सुख मिळेल. आरोग्य चांगले.

**कुंभ** – व्यवसायात वाढ होईल. नवीन संपर्क फायदेशीर ठरतील. ऊर्जा जास्त राहील.

**मीन** – मनातील इच्छा पूर्ण होऊ शकते. अध्यात्मात रस वाढेल. अचानक धनलाभ.

## शब्दगंध क्र. ७४८३ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७४८२ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) माह; महिना ३) सतत; अविरत; निरंतर ६) श्रीरामाचे चरित्र ७) उतरती काळ; शेवट; समाप्तीचा काळ ८) लाकडे फोडण्याचे एक शस्त्र १०) पांघरण्याचे एक जाड व उबदार वस्त्र; मस्ती; जोर १२) उष्णतेमुळे त्वचेतून बाहेर पडणारे पाणी; घर्मबिंदू १३) मागणीचा लकडा १५) पुढे होणाऱ्या घटनेचे अगोदरच लागलेले व्यवधान १६) लक्ष्मी व विष्णू १९) वातायन; खिडकी; झरोका २१) प्रणाम; सुरुवात; प्रारंभ; वंदन २२) मनुष्य; मानव २३) वस्तू; डाग; पर्वत

**उभे शब्द :-** १) अतिशय प्रयत्न; अडचण; पंचाईत २) पूर्ण भरतीची वेळ ३) टोकदार; नोकदार ४) एक प्रांत; लग्न कार्यासाठी जमलेली मंडळी ५) स्वाद; गोडी; चव ९) रत; लीन; गुंग; मन ११) जिचा पती वारला आहे अशी स्त्री; विधवा १४) लाज; लज्जा; हया १५) निराळा; अलग १७) मनातील विचार; मानसिकता १८) चिंतन; ध्यान २०) माफी

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : पडलात तरी चालेल, पण उठून पुन्हा धावायला शिका.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### दृष्ट लागणे म्हणजे नेमके काय? दारावर कोहळा का लावतात?

लहानपणापासून आपण ऐकतो की एखादं मूल खूप गोड दिसत असेल, छान कपडे घातले असतील किंवा एखादी नवी गोष्ट शिकले असेल तर मोठी माणसं म्हणतात कुणाची दृष्ट लागू नये!. पण दृष्ट लागणे म्हणजे नेमकं काय? यामागे भूत-प्रेताची गोष्ट आहे का? चला सोप्या भाषेत समजून घेऊ सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे आपल्या मनाची आणि शरीराची काळजी. लहान मुलांचं शरीर अजून वाढत असतं. त्यांची रोगप्रतिकारशक्ती मोठ्यांसारखी मजबूत नसते. त्यामुळे हवामान बदललं, जास्त खेळून थकले किंवा झोप पूर्ण झाली नाही की ते लगेच आजारी पडतात किंवा चिडचिड करतात. आणि योगायोगाने कोणी किती गोड आहे! असं म्हटल्यानंतर असं झालं की आपण म्हणतो दृष्ट लागली.

दुसरं कारण म्हणजे अचानक होणारा गोंधळ. एखादं मूल शांतपणे खेळत असतं. तेवढ्यात खूप लोक त्याच्याकडे बघतात, कौतुक करतात, फोटो काढतात, मोठ्याने बोलतात. एवढा सगळा आवाज आणि लक्ष एकदम आल्याने मुलाला घाबरायला होतं किंवा त्याचं लक्ष विचलित होतं. त्यामुळे ते रडायला लागतं. यालाच आपण दृष्ट लागली असं समजतो पूर्वीच्या काळी डॉक्टर आणि जंतू यांच्याबद्दल एवढी माहिती नव्हती. त्यामुळे बाहेरून आलेले लोक मुलाला हात लावतात, कडेवर घेतात. त्यामुळे सर्दी, खोकला किंवा इतर लहान आजार पसरू शकतात. यालाही आपले आजी-आजोबा दृष्ट लागणे म्हणायचे.

म्हणूनच ते मुलाला घराबाहेर नेताना काजळाचा टिळा लावतात, काळा धागा बांधतात किंवा लिंबू-मिरची दारावर टांगतात. यामागचा उद्देश वाईट लोकांचं लक्ष दुसरीकडे वळवणं आणि मुलाला सुरक्षित ठेवणं हा आहे. विज्ञान सांगतं की दृष्ट नावाची कोणती अदृश्य शक्ती नसते. पण आपल्या संस्कृतीत याचा अर्थ खूप चांगला आहे. कौतुक करताना लगेच देवाने दिलंय किंवा डोळे लागू नयेत असं म्हणणं म्हणजे दुसऱ्याच्या आनंदात जळू नये आणि नम्र राहावं हा संदेश आहे. थोडक्यात, दृष्ट लागणे म्हणजे भीती नाही, तर काळजी आहे. म्हणूनच लहान मुलांना वेळेवर खायला-प्यायला द्यावं, स्वच्छ ठेवावं, जास्त गर्दीत आणि उन्हात नेऊ नये. कोणी कौतुक केलं तर आनंदाने स्वीकारा, पण मुलाची काळजी घ्यायला विसरू नका. मग कोणतीही दृष्ट लागू शकत नाही आणि मूल नेहमी खेळत-हसत राहील.

आपण बऱ्याचदा बघतो की दर महिन्याच्या अमावस्येला काही लोक घराच्या दारावर कोहळा, काळ्या रंगाची बाहुली आणि लिंबू-मिरचीचा हार बांधतात. लहानपणी आपल्याला वाटतं हे काय भुतांसाठी आहे का? पण यामागे फक्त अंधश्रद्धा नाही, तर काही चांगली कारणं आहेत. सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे लक्ष विचलित करणे. पूर्वीच्या लोकांना माहित होतं की लोकांचा स्वभाव असा आहे की छान घर, नवीन गाडी किंवा गोड मूल बघितलं की लगेच कौतुक करतात. कधी कधी जळकी नजरही जाते. म्हणून कोहळा आणि काळी बाहुली सारख्या विचित्र दिसणाऱ्या वस्तू दारावर लावल्या. म्हणजे येणाऱ्या माणसाचं लक्ष आधी त्यांच्याकडे जाईल आणि घरातल्या चांगल्या गोष्टींकडे जाणार नाही. यालाच आपण दृष्ट काढणे म्हणतो.

दुसरं कारण म्हणजे स्वच्छता आणि कीटक. लिंबू आणि हिरव्या मिरचीचा वास खूप तिखट असतो. या वासाने डास, माशा आणि इतर लहान कीटक घरात येत नाहीत. शिवाय लिंबात व्हिटॅमिन C असतं आणि मिरचीत एक प्रकारचं तेल असतं जे हवेतल्या जंतूंना दूर ठेवायला मदत करतं. पूर्वी फ्रिज नव्हते, म्हणून ३-४ दिवसांनी हा हार बदलून टाकत. म्हणजे घरात हवा शुद्ध राहायची. तिसरं कारण म्हणजे हंगामी फळं आणि भाजीचा उपयोग. कोहळा हा स्वस्त असतो आणि खूप दिवस टिकतो. अमावस्येला जुना कोहळा काढून नवीन लावायचा आणि जुना रस्त्यावर फोडायचा. याने घरातली नकारात्मक ऊर्जा गेली असा समज होता. त्याचबरोबर कोहळ्याच्या बिया भाजून खातात, त्यामुळे अन्न वाया जात नसे.

शेवटचं कारण म्हणजे सवय आणि आठवण. अमावस्या म्हणजे महिन्याचा शेवट. त्या दिवशी घराची साफसफाई करायची, जुने हार बदलायचे आणि नवीन महिन्याची चांगली सुरुवात करायची. हा एक प्रकारचा रिमाइंडर होता. थोडक्यात, कोहळा, काळी बाहुली, लिंबू-मिरची लावणे म्हणजे भूत पळवणे नाही. हे लक्ष दुसरीकडे वळवणे, कीटक दूर ठेवणे, हवा शुद्ध करणे आणि महिन्याची साफसफाई करण्याची आपल्या पूर्वजांची हुशार पद्धत आहे. म्हणूनच जेव्हा पुढच्या वेळी तुम्हाला दारावर हे दिसेल तेव्हा घाबरू नका. समजा की घरातल्या मोठ्यांना घराची आणि आपल्या सगळ्यांची काळजी आहे.

### शिक्षणाचे महत्त्व


एका गावात दोन मित्र राहत होते राम आणि शाम. रामला शाळेत जाणे खूप आवडायचे. तो रोज अभ्यास करायचा, पुस्तकं वाचायचा. शामला मात्र खेळणे आणि मस्ती करणे आवडायचे. तो शाळेतून पळून जायचा.मोठे झाल्यावर गावात मोठा पूर आला. सर्वत्र अंधार होता, वीज गेली होती. रामने आपल्या शिक्षणाच्या जोरावर गावकऱ्यांना सुरक्षित जागी पोहोचवले. त्याने नकाशा वाचून रस्ता दाखवला, प्राथमिक उपचार केले आणि मदत पथकाला पत्र लिहून मदत मागवली.

शाम मात्र घाबरून एका झाडाखाली बसला होता. त्याच्याजवळ हात कंदील होता, पण तेल संपले होते. तो म्हणाला माझ्याजवळ प्रकाश आहे पण तो जास्त वेळ टिकणार नाही. रामने त्याला सांगितले, शाम, माझ्याजवळ कंदील नाही. पण माझ्याजवळ शिक्षणाचा दिवा आहे. तो कधीच विझत नाही. नंतर गावकरी सुरक्षित झाले. शामला आपली चूक कळली.

तो रामच्या पाया पडला आणि म्हणाला, खरा प्रकाश शिक्षणातच आहे.

**तात्पर्य :** शिक्षण हाच खरा दिवा आहे जो आयुष्यभर आपल्याला वाट दाखवतो. पैसा, घर, दागिने कधीही संपतात, पण शिक्षण कधीच कमी होत नाही. अडचणीच्या काळात शिक्षणच आपल्याला संकटातून बाहेर काढते.

## आत्मशक्ति



### संकटला धैर्याने द्यावे तोंड

कोणतेही शेवटी थकली, भागलेली ती स्त्री रिकाम्या हाताने भगवान बुध्दांकडे गेली. दुःख । वा पीडा न झालेले घर तिला मिळाले नसल्याने आपल्या मुलाचा मृत्यु अटळ होता हे कटु सत्य असल्याचे तिच्या लक्षात आले. संकटे ही आयुष्याचा एक भाग असतात.

आयुष्यभर संकटांना तोंड द्यावयास आम च्यापैकी पुष्कळसे लोक तयार होत नाहीत. संकटाखाली ते पिचून जाताता. सुरुवातीचे काही दिवस आम्ही आजारी माणसांची सेवासुश्रुषा उत्साहाने करतो. पण जसजसा त्याचा आजार बळावत जातो तो सुधारण्याचे लक्षण दिसत नाही. तसतशी आम्हाला जाणीव होते की जीवनातील ताण तणाव, आमचा मानसिक समतोल व धारिष्ट्य जणू आम्हाला आव्हान देत आहेत!

वाढत जाणारी संकटे व अडथळे आमच्यावर मात करतात असे आम्हाला दिसते. जेव्हा आमची नोकरी सुटते तेव्हा सुरुवातीचे काही दिवस आम्हाला वाटते की दुसरी एखादी चांगली नोकरी लवकरच मिळेल पण महिन्यांमागून महिने जातात पण आम्हाला यश मिळत नाही. तेव्हा आम्ही निराश होतो. कधी कधी आमच्या मुलाला चांगले गुण मिळत नाहीत म्हणून आम्ही निराश होतो. पण पुढे दरवर्षी त्याला कमी कमी गुण मिळत गेल्याने आम्ही पुरते खचून जातो, आमची बुध्दी काम देईनाशी होते. आयुष्याचा जोडीदार शोधतांना आम्ही उतावीळ बनतो. पण बरीच वर्षे आम्हाला जोडीदार मिळत नाही. आम्ही निराश होतो. मानसिक तणावाने शरीरावर परिणाम घडू लागतो आणि दुसरीकडे वैवाहिक जीवन यशस्वी होत नसल्याने जोडीदारापासून फारकतीची इच्छा केली जाते. एकमेकांचा विरह होत असल्याने दुःख वाढते व त्यामुळे शरीरावर परिणाम होतात.

अशा प्रकारे आयुष्यभरच्या संकटांना अंत राहत नाही. निसर्गापुढे आमचे काहीही बळ चालत नाही. आम्ही कुठल्याही प्रकारची खात्री देवू शकत नाही की आमचा व्यवसाय, घर-कुटुंब, धन किंवा आप्तस्वकीयांस दुरावणार नाही. आम्ही वादळवारे, ज्वालामुखी, महापूर वा नैसर्गिक आपत्तींना थोपवू शकत नाही. आमच्या भौतिक विनाशाला अडवू शकत नाही. पण एवढे मात्र करु शकतो की अशा संकटांशी आम्ही धैर्याने तोंड द्यावे (सामोरे जावे) ज्यामुळे आम्ही भयाने किंवा नाऊमेदीने खचून जाणार नाही, गलितगात्र होणार नाही ! (क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### त्यांची परीक्षा

सुरेश ओबेरॉय : एका दिवशी दोन विषयांच्या परीक्षा ?

शिवानीदीदी हो. आम्ही सकाळी ८.०० वाजता जायचो आणि दुपारी ४.०० वाजता परत यायचो. आम्ही खूप कष्ट (अभ्यास) करायचो कारण आम्हाला आठवी, नववी आणि दहावी अशा तीनही वर्षांचा अभ्यासक्रम असायचा. आता, परीक्षा फक्त दहावीच्या अभ्यासक्रमाची असते, तीही एका दिवशी एकाच विषयाची आणि त्यानंतर एक-दोन दिवस सुट्टी. याचा अर्थ आपण आयुष्य सोपं करत चाललो आहोत पण तरीही मुलं मनाने कमकुवत असणं हा मोठा प्रश्न आहे. आपल्यावर दोष देण्याचा संस्कार असल्याने मुलं तणावाखाली असण्यासाठी आपण परीक्षा, स्पर्धा आणि त्यातल्या दबावाला कारणीभूत ठरवतो.

सुरेश ओबेरॉय : याचं मूळ कारण पालकच आहेत.

शिवानीदीदी एक मुख्य कारण जेवढ्या लवकर पालक हे स्वीकारतील तेवढ्या लवकर त्यांना ह्या बाजूवर काम करायला सुरुवात करता येईल. जोपर्यंत पालक स्वतः जबाबदारी घेत नाहीत आणि इतरांना दोष देणं थांबवत नाहीत तोपर्यंत ते ह्या अडचणीच्या मुळाशी जाऊ शकणार नाहीत. आजकाल, घरातलं वातावरणच तणावपूर्ण असतं.

सुरेश ओबेरॉय : मुलं अभ्यास नीट करत नाहीत म्हणून आपण त्यांना रागवत राहतो. शिवानीदीदी : भलेही पालक काही बोलत नसतीलही. पण ते घरात येताना त्यांच्या बाबतीत दिवसभर घडलेल्या घटनांमुळे तयार होणारी तणावाची ऊर्जा घेऊन येतात. जर पालकांना मुलांना सगळ्यातलं उत्तम द्यायचं असेल तर त्यांनी हे लक्षात घ्यायला हवं की उत्तम सुखसोयी देण्यापेक्षा त्यांनी मुलांना उत्तम ऊर्जाक्षेत्र द्यावं. आजकाल आपण अशा मुलांना भेटतो ज्यांनी उत्तम शिक्षण घेतलेलं असतं पण ते मनाने कमकुवत असतात आणि त्यांना प्रचंड अहंकार असतो. कुठल्याही छोट्या गोष्टीने ते दुखावले जातात आणि समूहात काम करू शकत नाहीत.

माणसाचं आयुष्य चार खांबांवर टिकलेलं आहे भौतिक, मानसिक, सामाजिक आणि आध्यात्मिक. यांतील भौतिक भागाची काळजी आपण मुलांना उत्तम अन्न, घर, कपडे, इ. देऊन घेतो. (क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पेशंट : डॉक्टर मला रात्री झोप येत नाही. डॉक्टर : दुपारी झोपता का?
पेशंट : हो. डॉक्टर: मग दुपारची झोप बंद करा.
पेशंट : मग दिवस कसा जाईल?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* सर्वात मोठा महासागर कोणता?

– प्रशांत महासागर

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### वांगी

आधुनिक शाखा यांमध्ये शिअम, फॉस्फरस, लोह, 'क' जीवनसत्व, प्रथिने, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ, स्निग्धता हे सर्वच शरीरास लाभदायक असे पोषक घटक असतात. १) वांगी ही कफनाशक, अग्निप्रदीपक व सौम्य सारक गुणधर्माची असल्यामुळे भूक न लागणे, अपचन, मलावष्टंभ या विकारांवर गुणकारी आहेत. वांग्याचे सूप प्यायल्या मुळे भूक चांगली लागते व घेतलेल्या आहाराचे पचन होऊन शौचास साफ होते.

२) ज्यांना निद्रानाश विकाराचा त्रास होतो, त्या व्यक्तींनी कोवळी वांगी विस्तवावर भाजून त्याची साल काढून मधात कालवून रात्री चाटून खाल्ली, तर त्यांना चांगली झोप लागून निद्रानाश विकार दूर होतो.

३) ज्या स्त्रियांना हिवाळ्यामध्ये मासिक पाळीत रक्तस्राव कमी प्रमाणात होतो, त्या स्त्रियांनी वांग्याची भाजी, गूळ आणि बाजरीची भाकरी असा आहार काही दिवस नियमितपणे घेतला, तर स्रावाचे प्रमाण व्यवस्थित होते.

४) ज्या स्त्रियांचा वारंवार गर्भपात होतो, तसेच ज्यांना वंध्यत्व ही समस्या आहे, अशा स्त्रियांनी जांभळी वांगी उकडून त्याचे कमी तिखट भरीत करून खावे व त्यासोबत ग्लासभर ताक प्यावे. असे महिनाभर केल्यास शरीरामध्ये 'ई' जीवनसत्त्व शोषून घेण्याची शक्ती वाढते. तसेच गर्भधारणेसाठी आवश्यक असणाऱ्या प्रोजेस्टेरॉन या अंतःस्रावाचे प्रमाणही वाढते व गर्भपाताचा धोकाही टाळला जातो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# फिरोदिया शिवाजियन्सच्या ८ व्या आंतरशालेय स्पर्धेला प्रारंभ

## अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर रंगला फुटबॉलचा थरार

नगर – जिल्ह्यातील नवोदित फुटबॉलपटूंना प्रोत्साहन देत शालेय स्तरावरील फुटबॉल संस्कृती बळकट करणाऱ्या फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित ८ व्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेला २७ जुलै रोजी प्रारंभ झाला. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या उद्घाटन सोहळ्यानंतर फुटबॉलच्या रोमांचकारी लढतींना सुरुवात झाली. यंदाच्या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध शाळांमधील ५३ संघ सहभागी झाले असून १२ वर्षांखालील मुले, १४ वर्षांखालील मुले, १६ वर्षांखालील मुले आणि १६ वर्षांखालील मुली अशा चार गटांत १०० हून अधिक सामने खेळविण्यात येणार आहेत.



अहमदनगर कॉलेजच्या मैदानावर फुटबॉल स्पर्धेनिमित्त मैदान पूजन करताना उद्योजक नरेंद्र फिरोदिया.

ही स्पर्धा अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर होत असून, अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेच्या आठव्या पर्वाच्या उद्घाटनप्रसंगी सहभागी सर्व शालेय संघांच्या कर्णधारांच्या उपस्थितीत फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनचे मुख्य विश्वस्त तथा अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि शिवाजियन्स स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष तथा फुटबॉल असोसिएशनचे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांच्या हस्ते मैदानाचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आकाशात रंगीबेरंगी फुगे सोडून स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

पाहुण्यांनी फुटबॉलला किक मारून पहिल्या सामन्याचा प्रारंभ केला आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, फुटबॉल असोसिएशनचे सहसचिव प्रदीप जाधव, उपाध्यक्ष खालिद सय्यद, कार्यकारिणी सदस्य राजू पाटोळे, फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमीच्या मुख्य आयोजन समितीच्या सदस्य पल्लवी सैंदाणे, जेव्हिअर स्वामी, राजेश अँथनी, अभय साळवे, अभिषेक सोनवणे यांच्यासह शिवाजियन्स स्पोर्ट्स क्लबचे पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच, खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी म्हणाले, फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमीने जिल्ह्यात फुटबॉल खेळाची भक्कम पायाभरणी केली आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक विद्यार्थ्यांना आपल्या गुणवत्तेचे प्रदर्शन करण्यासाठी ही स्पर्धा मोठे व्यासपीठ ठरते. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थी सक्षम होणे ही काळाची गरज आहे. अहमदनगर महाविद्यालयाने नेहमीच क्रीडा क्षेत्राला प्राधान्य दिले असून भविष्यातही अशा उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य कायम राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले, फिरोदिया शिवाजियन्सची आंतरशालेय फुटबॉल स्पर्धा ही केवळ सामने खेळविण्यापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती जिल्ह्यातील फुटबॉल चळवळीचा एक महत्त्वाचा भाग बनली आहे. दरवर्षी नवीन शाळा, नवीन संघ आणि नव्या खेळाडूंचा सहभाग वाढत आहे. विशेष म्हणजे मुलांबरोबरच मुलींचे संघही मोठ्या उत्साहाने सहभागी होत असल्याने महिला फुटबॉललाही नवी दिशा मिळत आहे. प्रत्येक खेळाडूने मैदानात स्वतःचे सर्वोत्तम प्रदर्शन करावे.

ही स्पर्धा लीग–कम–नॉकआऊट पद्धतीने खेळविण्यात येत असून प्रत्येक संघाला साखळी फेरीत आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे एका पराभवामुळे स्पर्धेबाहेर पडण्याऐवजी प्रत्येक संघाला अधिक सामने खेळण्याची संधी मिळणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रिस्टीन अब्राहम यांनी केले. खालिद सय्यद यांनी आभार मानले.

स्पर्धेदरम्यान खेळाडूंच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रियंका सूर्यवंशी या फिजिओ म्हणून कार्यरत आहेत. पंच म्हणून शशांक वाल्मिकी, सोनिया दोसानी, प्रकाश कनोजिया, विल्यम राज आणि वैभव मनोदिया हे कार्यरत आहेत.

# प्रेरणादायी अक्षरधन

## सुख धनात की समाधानात?

"मुसाफिर" संकलन: दिशान फिचर्स




सुख धनात की समाधानात. हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात. प्रत्येक जण उत्तराच्या शोधात. काय पैसा कमवायचा आणि नुसता जमवायचा? खर्चायचं धन, की धनासाठी खर्ची घालायचं तन मन ? मग आठवतं गोभट्टाचं एक संस्कृत सुभाषित की, धनाची हाव आणि कट्यारीचा घाव सारखाच घातक। दृढतर निबद्धमुष्टेः कुपणस्य कृपाणस्यच केवलमाकारतो भेदः ।।

पैसा मिळवायचा, पण मुठीत घट्ट बांधून ठेवायचा. मुळीच नाही खर्चायचा । तिजोरीत दडपायचा. ही वृत्ती वाईटच । म्हणून जो मुठीत घट्ट पकडतो कट्यार, हे दोघेही सारखेच गळेकापू. कुपण आणि कुपाण कृतीने काळेकुट्टच। अक्षरशः दोघांत फक्त आकाराचाचा फरक ।

संत दयाळनाथ आठवावे वेळा. ते म्हणतात.

काय ते सुखाचे विधान । केवळ सुखी हे नुसते विधान । मात्र व्यर्थ ।।

सतत सुख देणारे प्रचंड सुखनिधान कोणते ? मनात वाटणारे समाधान हेच, ओळखावे ते. मीलुखी असे केवळ बोलते, स्वतःला फसवते. मनात फक्त कुंढते, अस्वस्थेचे धनी होते. । समर्थ रामदासांनी सांगितलेली सतत दुःखभोगी अभाग्याची लक्षणे मग लक्षात येतात.

त्याची पैशावरती कुबुद्धी तेथे कैची असेल शुद्धी कुबुद्धी तेचि सुबुद्धी। ऐसे वाटे ।।

राजा मिडासची खरी कहाणी ठाउक आहे.?

एक होता राजा त्याचं नाव मिडास केवळ धन जमवायचा हव्यास. सोन्याच्या विटा गोळा करायचा ध्यास. एक खोली सोन्याच्या विटांनी भरली. पण तळघरातली रिकामीच राहिली. त्या चितेनं राजाची झोप उडाली. देवदुताला त्याची दया आली. हवं ते माग म्हणाला.

राजा आनंदला. तळघरातली खोली सोन्यानं कशी भरावी? ते सांग म्हणाला. देवदूत म्हणाला, तथास्तु. हात लावशील त्याचं सोनं होईल. देवदुत गेला. राजा आनंदानं वेडा झाला. आता दगडविटांना हात लावील त्याचं सोनं होईल. तळघरातली खोली सोन्याच्या विटांनी भरील । तेवढ्यात सेवकानं भोजन आणलं. राजाला भूक लागलेलीच होती. तो अन्नाला हात लावणार, तोच दचकला, देवदुत म्हणाला आहे, हात लावशील त्याचं सोनं होईल । भोजनाचं सोनं झालं तर पोटात काय जाईल? त्यानं भोजनाला हात लावला नाही. पाण्याला तरी स्पर्श कसा करणार ?

लाडकी लेक जवळ धावत आली. राजानं तिला दुर हो म्हणून जवळ घेतली नाही. मुलगी रडायला लागली. राजसभेत परदेशचे राजदुत भेटायला आले. त्यांच्याशी राजानं हस्तांदोलन केल नाही. राजदुत चिडले। सगळं जीवनच विस्कटलं। त्यानं देवतुताचं सतत स्मरण सुरु केलं.

पुन्हा देवदुत आला. धनलोभापायी मी अविचार केला. पण आता त्यावर उपचार करा म्हणून त्यानं देवदुताला विनंती केली.

देवदुत हसला व म्हणाला, राजा। धनलोभापायी तुझी बुद्धीही चालेनाशी झालेली दिसते? अरे, मी म्हणालो त्याचा अर्थ तु भलताच केलास। अरे, तु हात लावशील त्याचं सोनं होईल याचा अर्थ तु ज्या कामात हात घालशील तिथं तुझी फत्ते होईल. तुला यशप्राप्ती होईल, असा वर मी दिला.

मिडास समजला. भानावर आला. जनकल्याणाच्या कामाला लागला. त्याला खूपखूप समाधान मिळालं.

**– किशोर गांधी**

# श्री वल्लभ प्रतिष्ठानतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त रक्तदान शिबीर आणि धार्मिक कार्यक्रम

नगर – सध्या निर्माण झालेला रक्ताचा तुटवडा काहीअंशी कमी करावा, या उद्देशाने येथील श्री वल्लभ प्रतिष्ठानतर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त (दि. २९) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात जास्तीत जास्त इच्छुक रक्तदात्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे रक्तदान शिबीर सावेडी भागातील गुलमोहोर रस्त्यावरील किर्लोस्कर कॉलनीमधील श्री दत्त भाव गुरु मंदिर येथे सकाळी १०.३० ते दुपारी ३ या वेळेत होणार आहे. नावनोंदणी व अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ९४२२७३९२८० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या मंदिरात दरवर्षी गुरुपौर्णिमा उत्सव उत्साहाने साजरा करण्यात येतो. यानिमित्त अभिषेक व पूजा, आरती व प्रसाद, पालखी मिरवणूक तसेच महाप्रसादाचेही आयोजन करण्यात येते. याचबरोबर यावर्षी रक्तदान शिबीर घेण्यात येत आहे. हे सर्व कार्यक्रम २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त साजरे होणार आहेत, अशी माहिती श्री वल्लभ प्रतिष्ठानचे अध्यक्ष गुरुवर्य विवेक रणभोर आणि श्री वल्लभ प्रतिष्ठानच्या इतर कार्यकर्त्यांनी दिली.

# कथाकथनकार बाळासाहेब देशमुख यांचा संत तुकाराम महाराज पुरस्काराने सन्मान

नगर – स्व. पै किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व पै. नाना डोंगरे व्यायाम शाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय ०७ वे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन, निमगाव वाघा येथे २५ जुलै रोजी संपन्न झाले. साहित्य संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक शंकर अंदानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून माधवराव लामखडे हे होते.



कथाकथनकार बाळासाहेब देशमुख यांना ग्रामीण साहित्य संम्मेलनात पुरस्काराने गौरविण्यात आले.

ग्रामीण साहित्य संमेलन मध्ये कथाकथन, कवी संमेलन, विविध क्षेत्रातील मान्यवरांचे पुरस्कार असे कार्यक्रम संपन्न झाले. पुरस्कार विजेत्यांना माननीय माधवराव लामखडे यांच्या शुभहस्ते ट्रॉफी व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. बाळासाहेब देशमुख यांना जगद्गुरु संत तुकाराम महाराज कथाकथनकार पुरस्कार माधवराव लामखडे यांच्या हस्ते देण्यात आला. देशमुख यांचे आजवर अहिल्यानगर जिल्ह्यात ५०० कथाकथन प्रयोग पूर्ण झालेले आहेत. शिवाय विविध आकाशवाणी केंद्रावर १२० कथा प्रसारित झालेल्या आहेत. राज्यस्तरीय साहित्य संमेलनमध्ये त्यांचे आजवर ३३ कथाकथन प्रयोग पूर्ण झालेले आहेत. रंग माझा वेगळा, माणसे अशी.. अन् तशीही.., माणसं भिंगातून... हे तीन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. आयोजक नानासाहेब डोंगरे यांना प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन संदीप रासकर यांनी केले. बाळासाहेब देशमुख यांचे ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पालवे, बाबुराव उपाध्ये, सदानंद भणगे, इतिहास अभ्यासक नवनाथ वाव्हळ, दिलीप कापसे, रूपचंद शिदोरे, सुरेखा घोलप यांनी अभिनंदन केले आहे.

# आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने आदम बशीर शेख सन्मानित

नगर – शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, उपक्रमशील कार्य आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेत ढवळपूरी (ता. पारनेर) येथील श्री दुर्गादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक आदम बशीर शेख यांना अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाच्या वतीने आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.



अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल येथे आयोजित सोहळ्यात आदम शेख यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

शहरातील अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे शिक्षण निरीक्षक श्रीराम थोरात यांच्या हस्ते आदम शेख यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त आणि सामाजिक मूल्यांची जोपासना करण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे विशेष कौतुक केले.

या पुरस्कार सोहळ्यास माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळाचे राज्याध्यक्ष संजयकुमार निक्रड, अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे जिल्हाध्यक्ष नवनाथ घुले, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित, तसेच विष्णू मगर, राजेंद्र बारगुजे, अविनाश बोंद्रे, दीपक शिंदे, अतुल पटवा, कल्याण ठोंबरे, सोमनाथ सुंबे, अमोल देशमुख, नवनाथ साळवे, नितीन जगताप, इस्माईल शेख, अनिल वाकचौरे आदी उपस्थित होते.

आदम बशीर शेख यांनी ढवळपूरी येथील श्री दुर्गादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक म्हणून त्यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत लक्षणीय वाढ घडवून आणली आहे. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची आवड निर्माण करणे, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, डिजिटल शिक्षणाचा वापर, विविध शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन, विज्ञान, गणित आणि सामाजिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे, तसेच संस्कारक्षम आणि जबाबदार नागरिक घडविण्याच्या दृष्टीने त्यांनी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत गुणवत्ता, शिस्त आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा त्यांनी अवलंब केल्यामुळे उपक्रमशील मुख्याध्यापक म्हणून त्यांनी जिल्ह्यात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची दखल घेत अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळाने त्यांचा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार देऊन गौरव केला. सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल रंगलेले बालवारकऱ्यांचे रिंगण.

# प्रियदर्शनी स्कूलमध्ये विठू माऊलीच्या जयघोषात अवतरले पंढरपूर

नगर – भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल येथे सालाबाद प्रमाणे आषाढी एकादशीच्या अनुषंगाने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये बालदिंडी सोहळा, भक्ती गीताचा मधुर संगम, रिंगण सोहळा, आणि विविध संतांच्या वेशभूषेतील चिमुकल्यांचा आनंद तसेच विठू माऊलींचा गजर यामुळे शालेय वातावरण भक्ती रसात न्हावून गेले आणि जणू साक्षात पंढरपूरच अवतरल्याचा भास निर्माण झाला.

यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून ॲड. हभप स्वराली गोडबोले–भालेराव व प्रवीण भालेराव हे उपस्थित होते. ॲड. भालेराव यांनी आपल्या प्रवचनरूपी मधुर वाणीतून आई, वडिलांची सेवा, भारतीय संस्कृतीची जपवणूक, गुरुजनांप्रति आदर, राष्ट्राबद्दल प्रेम, आपुलकी म्हणजेच पंढरीची वारी आहे, असे सांगितले. प्रमुख पाहुण्याची प्रवचन रूपी सेवा सर्व भाविकांना म्हणजेच शिक्षक विद्यार्थी आणि पालकांना पर्वणीच ठरली.

याप्रसंगी शाळेच्या प्राचार्या अंजली बोधक, उपप्राचार्य अमोल घोरपडे, पर्यवेक्षक अनिता थापा तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर प्रसाद म्हणून सर्वांना लाडूचे वाटप करण्यात आले व आषाढी एकादशीच्या या रम्य सोहळ्याची पसायदानाने सांगता करण्यात आली.



विनायकराव देशमुख यांची नुकतीच जिल्हा नियोजन मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा बाणेश्वर कॉलनीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# श्रीराम मंदिर परिसर सुशोभिकरण प्रयत्न करु

## विनायकराव देशमुख यांचे प्रतिपादन

नगर – आपल्या सर्वांच्या सदिच्छांमुळे मला जिल्हा नियोजन मंडळावर काम करण्याची संधी मिळाली. या संधीच्या माध्यमातून बुऱ्हाणनगर येथील बाणेश्वर कॉलनीतील श्रीराम मंदिर परिसर सुशोभिकरणासाठी आपण प्रयत्न करु, असा विश्वास जिल्हा नियोजन समितीचे सदस्य विनायकराव देशमुख यांनी व्यक्त केला.

देशमुख यांची नुकतीच जिल्हा नियोजन मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा बाणेश्वर कॉलनीच्या वतीने ज्येष्ठ सदस्य अविनाश पावले, कॉलनीचे सचिव शेखर देशपांडे, शैलेंद्र तरवडे त्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी देशमुख बोलत होते.

देशमुख म्हणाले, आपल्या मागच्या पिढीने दूरदृष्टी ठेवून साठ वर्षांपूर्वी या कॉलनीची स्थापना केली. सुदैवाने आज नवी पिढी देखील शिस्तबद्ध पद्धतीने कॉलनीचा विकास व्हावा, यासाठी कार्य करीत आहे. प्रभू रामचंद्राच्या कृपेने मला आतापर्यंत विविध राजकीय व सामाजिक पदांवर काम करण्याची संधी मिळाली. आता नियोजन मंडळावर झालेल्या नियुक्तीचा मला आनंद आहे. सुदैवाने आपल्या गावचे सुपुत्र आ. अक्षयदादा कर्डिले विधानसभेत प्रतिनिधीत्व करत आहेत. त्यांच्याशी चर्चा करुन व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सहकार्याने बाणेश्वर कॉलनीतील श्रीराम मंदिराचा परिसर आदर्श व सुशोभित करण्यासाठी आपण विशेष प्रयत्न करणार आहोत, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रारंभी श्रीराम मंदिर परिसराचे सुशोभीकरण व बाणेश्वर कॉलनीतील सुविधा याबाबत झालेल्या चर्चेमध्ये सर्वश्री अविनाश पावले, शेखर देशपांडे, शैलेंद्र तरवडे, प्रमोद चतारे, सुनील पावले, अक्षय कराळे, सुहास करंजीकर, श्रीनिवास नाबरीया, प्रशांत काळे, बापूसाहेब निंबाळकर, रवींद्र देशमुख, हर्षवर्धन देशमुख, उमेश आकडे, अतुल केसकर, ओंकार तोरडमल आदींनी सूचना मांडल्या.

# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत रक्त चाचणी शिबीर उत्साहात

नगर – माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त अहिल्यानगर शहर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले मोफत व सवलतीच्या दरातील रक्त चाचणी शिबिर सोमवारी उत्साहात पार पडले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून मोठ्या संख्येने नागरिकांनी विविध रक्त चाचण्यांचा लाभ घेतला.



उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत व सवलतीच्या दरातील रक्त चाचणी शिबिर घेण्यात आले.

मेट्रोपोलिस हेल्थकेअर लिमिटेड (मेट्रोपोलिस लॅब) यांच्या तांत्रिक सहकार्याने भिस्तबाग चौक, सावेडी येथील मेट्रोपोलिस लॅबमध्ये सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरामध्ये थायरॉईड, कोलेस्टेरॉल यांच्या चाचणी मोफत करण्यात आल्या. तर शुगर, बॉडी व्हायटल पॅकेज या चाचण्या अत्यल्प दरात करण्यात आल्या. तसेच इतर विविध रक्त चाचण्यांवर ५० ते ६५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात आली होती. १२५ हून नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

यावेळी महानगर प्रमुख किरण काळे, जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, उपशहर प्रमुख सुनील भोसले, युवा सेना जिल्हाप्रमुख निलेश खोडदे, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे, केडगाव शिवसेनेचे प्रतीक बारसे, राम वाणी, राम झिने, महिला आघाडीच्या नलिनी गायकवाड, उषा भगत, शैला लांडे, वेणूबाई वाणी, रजनी ताठे, विकेश गुंदेचा, सागर चाबुकस्वार, चंद्रकांत उजागरे, सचिन नवघिरे, शंकर आव्हाड, गणेश आपरे, राम धोत्रे, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, विजय शिरसाट, महावीर मुथा, किशोर कोतकर, आप्पा लांडगे, बाबासाहेब वैरागर, जयराम आखाडे, सुमित चव्हाण आदी उपस्थित होते.

# विळद येथे शंभरहून अधिक ज्येष्ठ नागरिकांना साडेसात लाखांच्या सहाय्यक साधनांचे वाटप

नगर – राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या वतीने आयोजित जेष्ठ नागरिकांना वयोश्री योजनेअंतर्गत मोफत सहाय्यक साधनांचे वितरण आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते विळद घाट येथे करण्यात आले. या कार्यक्रमात शंभरहून अधिक ज्येष्ठ नागरिक लाभार्थ्यांना सुमारे साडेसात लाखांचे सहाय्यक साधनांचे वाटप झाले. यामध्ये बॅटरीवर चालणाऱ्या तीन चाकी सायकल, श्रावण यंत्र, कमोड सहित व्हीलचेयर, कमोड चेअर, सिलिकॉन कुशन, गुडघ्याचा, पाठीचा व मानेचा पट्टा, साधी काठी, कुबडी व फोल्डिंग वॉकर अशा विविध उपयुक्त साहित्य मोफत देण्यात आले.



डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या वतीने आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते गरजूंना मोफत सहाय्यक साधनांचे वितरण करण्यात आले.

यावेळी आ. जगताप म्हणाले, राज्याचे स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सारखा पहाटे ५ वाजल्यापासून शेतकऱ्यांच्या बांधा ते विमानतळापर्यंत काम करणारा नेता आजपर्यंत राज्यात झाला नाही. मात्र नियतीने कार्यकर्तुत्ववान, स्पष्टोक्ता व परखड विचारांचे चालते बोलते नेतृत्व आज आपल्यातून हिरावून घेतले आहे. महाराष्ट्र घडवण्याचे काम त्यांनी केले. त्यांचे निधनाची घटना प्रत्येकाच्या मनाला चटका लावून गेल्याने आजही सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. फार कमी राजकीय व्यक्तींची जयंती शासकीय स्तरावर साजरी होते. स्व.अजितदादांच्या कार्य कर्तुत्वामुळेच त्यांना हे भाग्य लाभले आहे. स्व.अजित पवार यांनी माझ्यामागे उभे राहून मला पाठबळ दिल्यानेच मी शहराचा मोठा भौगोलिक विकास करू शकलो. त्यांचे विचार व कार्य सर्वांना पिढ्यानपिढ्या मार्गदर्शक ठरणार असल्याने पुढील काळात त्यांच्या विचारांचे व कामाचे अनुकरण करून काम करत राहू, असे आवाहन आ.संग्राम जगताप यांनी केले.

या कार्यक्रमास डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे जनरल सेक्रेटरी डॉ. पी.एम. गायकवाड, प्रशासकीय अधिकारी डॉ. राम पडाळकर, संचालक डॉ. अरुण त्यागी, प्राचार्य प्रतिभा चांदेकर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे संचालक अभिजीत दिवटे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. दीपक अनाप यांनी केले. डॉ सतीश मोरे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रास भेट देऊन साहित्य निर्मितीच्या कामाची पाहणी करून कौतुक केले.



चातुर्मासानिमित्त प्रवीणऋषी महाराजांचे केमिस्ट परिवाराच्यावतीने केमिस्ट टोपी घालून स्वागत करण्यात आले.

# चातुर्मासानिमित्त प्रवीणऋषी महाराजांचे केमिस्ट परिवाराच्यावतीने हटके स्वागत

नगर – प्रवीणऋषी महाराज साहेब यांच्या अहिल्यानगर येथील समर्पण चातुर्मासानिमित्त जिल्ह्यातील केमिस्ट परिवाराच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. आगमनानिमित्त काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीत जिल्हाभरातील सुमारे दीडशे केमिस्ट बांधवांनी केमिस्ट टोपी परिधान करून उत्स्फूर्त सहभाग नोंदवित आपले वेगळेपण अधोरेखित केले.

या स्वागत सोहळ्यात जिल्हा केमिस्ट संघटनेचे अध्यक्ष दत्ता गाडळकर, माजी अध्यक्ष संजय गुगळे, प्रमोद सोळंकी, अनिल गांधी, अभय मुथा, कमलेश गुंदेचा, भरत सुपेकर, मनोज खेडकर, संदीप धोका, संकेत गुगळे, अमित धोका, प्रमोद गांधी यांच्यासह जिल्ह्यातील अनेक केमिस्ट बांधव उपस्थित होते.

यावेळी अहिल्यानगरचे आ. संग्राम जगताप, नगरसेवक गणेश भोसले आणि संजय चोपडा यांनीही मिरवणुकीत सहभाग घेतला.

केमिस्ट संघटनेच्या वतीने सादर करण्यात आलेला आगळावेगळा सहभाग आणि शिस्तबद्ध उपस्थिती मिरवणुकीचे विशेष आकर्षण ठरली.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भोयरे गांगर्डा येथे आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.

# भोयरे गांगर्डा येथे नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

नगर – भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा आणि भोयरे गांगर्डा ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भोयरे गांगर्डा (ता. पारनेर) येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त हे शिबीर पार पडले.

हा उपक्रम पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजप प्रदेश उपाध्यक्ष सुजय विखे पाटील, पारनेर तालुकाध्यक्ष राहुल शिंदे तसेच दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच संतोष केकडे, उपसरपंच आदिनाथ गायकवाड, भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर, राहुल शिंदे, दत्ता पवार, मनोज मुंगसे, लहु भालेकर, माजी सरपंच भाऊसाहेब भोगडे, माजी उपसरपंच दौलतराव गांगड, किशोर रसाळ, नाना केकडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष युवराज डोंगरे, सेवा सोसायटी संचालक माणिक पवार, व्हाईस चेअरमन सचिन रसाळ, उद्योजक अक्षय भोगाडे, अक्षय गरदारे, दादासाहेब जवक, गणेश गायकवाड, राजेंद्र गांगड, प्रमोद रसाळ, विवेक गायकवाड, शेखर पवार, तात्यासाहेब रसाळ, माजी चेअरमन अशोक पवार, संचालक शिवाजी रसाळ आदी उपस्थित होते.

शिबिरामध्ये नागरिकांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह, विविध आजारांचे प्राथमिक निदान तसेच आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. अनेक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत आरोग्य तपासणी करून घेतली.

# आजी–आजोबांना वंदन, वृक्षांना जीवन

## डॉन बॉस्को शैक्षणिक संकुलात कृतज्ञतेचा अविस्मरणीय सोहळा

नगर – डॉन बॉस्को शैक्षणिक संकुलामध्ये आजी–आजोबा कृतज्ञता सोहळा मोठ्या उत्साहात व आनंदामध्ये साजरा झाला. सर्व आजी–आजोबांचे पुष्प वर्षावाने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्णवी अमोलिकने केले आणि त्यानंतर इशस्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी स्वागत गीत, नाटिका, कविता, नृत्य व पत्र वाचनाद्वारे आजी आजोबा यांच्या प्रति असणारी कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमातून आजी–आजोबा भारावून गेले.



डॉन बॉस्को शैक्षणिक संकुलामध्ये आजी आजोबांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या कमल सुरेश पंडित या होत्या. त्यांचा परिचय सुहासिनी देठे यांनी केला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून आजी आजोबा हे कुटुंबाचे संस्कार वृक्ष आहेत आणि सदैव आपल्या नातवंडांच्या हितासाठी ते प्रयत्नशील असतात, नातवंडांच्या सहवासामध्ये आजी–आजोबा रमून जातात म्हणून नातवंडांनी आजी–आजोबांचा सन्मान केला पाहिजे हे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी केले.

शाळेचे प्राचार्य फादर अजित मुनीस यांनी आजी–आजोबांचे स्वागत केले व नातवंडांवर प्रेम करावे. परंतु अवास्तव लाड करू नयेत. त्यामुळे काही नातवंडे बिघडण्याचा संभव असतो. मोबाईलपासून नातवंडांना दूर ठेवावे व अभ्यासाकडे लक्ष देण्यासंदर्भात त्यांना आजी–आजोबांना मार्गदर्शन केले.

या दिनाचे औचित्य साधून वृक्ष संवर्धनाच्या दृष्टीने आजी आजोबांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. तसेच आजी आजोबांसाठी मनोरंजक खेळ घेण्यात आले, यामध्ये सर्वजण रमले होते. आनंदाच्या व उत्साहाच्या वातावरणामध्ये आजचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी जवळपास दोनशे पेक्षा जास्त आजी आजोबा उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव फादर रिचर्ड डिसिल्वा, इंग्लिश मीडियमचे मुख्याध्यापक रिचर्ड बुरखाव, व्यवस्थापक फादर थॉमस बेस्टीन, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका शिल्पा वैजापूरकर हे उपस्थित होते. शाळेचे समन्वयक फ्रान्सिस पाटोळे व डॉ. शितल कोतकर यांनी मोलाचे सहकार्य केले. सूत्रसंचालन सृष्टी खरात व रेचल पवार या दोघींनी केले. मनीषा शिंदे, असावरी खोपे, जयश्री शिंदे यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.

# अहिल्यानगर रनर्स क्लबची पंढरपूर रनवारी

नगर – अहिल्यानगर रनर क्लबच्यावतीने अहिल्यानगर ते पंढरपूर अशी रनवारी काढून श्रद्धा, शिस्त आणि सेवाभावाचे दर्शन घडविले. दोन दिवसात धावत जावून पांडुरंगाचे दर्शन घेत ही रनवारी अहिल्यानगरच्या धावपटूंनी यशस्वीरित्या पूर्ण केली.

या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व रनर्सनी विठ्ठल नामाचा अखंड गजर करत भक्ती, फिटनेस आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम अनुभवला. वारीच्या परंपरेला आधुनिक फिटनेस संस्कृतीशी जोडणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला. सहभागी धावपटूंना उत्कृष्ट नियोजनाचा अनुभव मिळाला. मार्गावर नियमित हायड्रेशन पॉइंट्स, पौष्टिक आहार, वैद्यकीय मदत, वाहन सहाय्य, सुरक्षा व्यवस्था, फोटोग्राफी, वेळेचे काटेकोर नियोजन आणि स्वयंसेवकांचे सातत्यपूर्ण सहकार्य यामुळे संपूर्ण प्रवास अत्यंत सुरळीत आणि सुरक्षित झाला. प्रत्येक सहभागीने समाधान व्यक्त करत या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.



अहिल्यानगर ते पंढरपूर रनवारी पूर्ण केल्यानंतर विठ्ठल मुर्तीजवळ दर्शन घेऊन आनंद व्यक्त करताना रनर्स.

रनवारीचे सर्व टप्पे नियोजनानुसार पूर्ण झाले आणि सर्व धावपटूंनी सुरक्षितपणे पंढरपूर गाठून श्री. विठ्ठल–रुक्मिणीचे दर्शन घेतले. भक्ती, संघभावना, शिस्त आणि परस्पर सहकार्यामुळे हा प्रवास प्रत्येकासाठी अविस्मरणीय ठरला. या उपक्रमाच्या यशामागे अहिल्यानगर रनर्स क्लबच्या सर्व आयोजक, स्वयंसेवक, कॅप्टन्स, सपोर्ट क्रू, वैद्यकीय पथक, हायड्रेशन टीम, फोटोग्राफर्स तसेच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्व दात्यांचे व हितचिंतकांचे मोलाचे योगदान राहिले. त्यांच्या निःस्वार्थ सेवेमुळे प्रत्येक वारकऱ्याला सुरक्षित, आनंददायी आणि संस्मरणीय अनुभव मिळाला.

अहिल्यानगर रनर्स क्लबने यापूर्वीही अनेक सामाजिक व फिटनेसविषयक उपक्रम यशस्वीरित्या राबविले असून, रनवारी २०२६ हा त्यामधील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. यावेळी वारीमध्ये ३३ पुरुष, ७ महिला सहभागी झाल्या होत्या.

या उपक्रमाने श्रद्धा, आरोग्य, शिस्त आणि समाजसेवा यांचा सुंदर संदेश समाजापर्यंत पोहोचवला.

अहिल्यानगर रनर्स क्लबतर्फे या उपक्रमाला सहकार्य करणाऱ्या सर्व सहभागी, सहकारी संस्था, प्रायोजक, प्रशासन, पोलीस विभाग, वैद्यकीय टीम, माध्यम प्रतिनिधी आणि सर्व हितचिंतकांचे या क्लबचे वारी यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणारे जगदीप मकर, योगेश खरपुडे, गौतम जायभाय, विलास भोजने यांनी सर्वांचे आभार मानले.



पंढरपूर वारीत परिते येथील डीसीसी बँकेच्या आवारात वारकऱ्यांनी वृक्षारोपण केले.

# स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आषाढी वारीत वारकऱ्यांचे वृक्षारोपण

नगर – आषाढी वारीसाठी अहिल्यानगर शहरातून पंढरपूरला गेलेल्या वारकऱ्यांनी राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. लायन्स क्लब व निसर्ग व सामाजिक प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हाध्यक्षा लतिकाताई पवार यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. सोलापूर जिल्ह्यातील परिते येथील डीसीसी बँक शाखेच्या परिसरात विविध प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

या उपक्रमात डीसीसी बँकेचे शाखाधिकारी एच. बी. लामकाते, कुर्मदास साखर कारखान्याचे संचालक राहुल पाटील, परिते विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन हनुमंत लांडे, विशाल मिस्किन, जे. के. काळे, बँकेचे कर्मचारी तसेच आषाढी वारीतील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. दिंडीतील छायाताई राजपूत, सुषमा दंडवते, पुष्पा वाकळे, संगीता देव्हारे, अनुसया दंडवते, सुनीता कानडे, गंगुबाई वाघ, सपना लाटे, केशर गांगर्डे, मंगल चव्हाण आणि शारदा दळवी यांच्यासह अनेक वारकऱ्यांनी वृक्षारोपणात सहभाग घेत पर्यावरण रक्षणाचा संकल्प केला. उपस्थितांनी वृक्ष लागवड करून स्व. अजित पवार यांना अभिवादनच केले. तर एक वृक्ष म्हणजे अनेक पिढ्यांसाठी जीवनाचा श्वास हा संदेशही समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. वारीच्या पवित्र वातावरणात पार पडलेल्या या उपक्रमामुळे अध्यात्म आणि पर्यावरण संरक्षणाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

# पुणे येथील राज्यस्तरीय गुणगौरव सोहळ्यास विजय भालसिंग प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित

नगर – स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर तसेच क्रांती दिनाच्या पूर्वसंध्येला पुणे येथील वानवडी परिसरात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय गुणगौरव सोहळ्यास विजय भालसिंग यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा सोहळा ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी वानवडी येथील महात्मा ज्योतिराव फुले सांस्कृतिक भवन येथे पार पडणार आहे.



मातोश्री द्रोपदा बबन पठारे चॅरिटेबल ट्रस्ट, छत्रपती शेतकरी सेना, बहुजन भूमी संघटना संचलित मानव हक्क, माहिती अधिकार, दक्ष पोलिस मित्र सहकार सेना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या योगदानाचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देण्याचा या सोहळ्याचा मुख्य उद्देश आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, मुंबईतील प्रसिद्ध कोळी नटसम्राट राजेश खर्डे वेसावकर, महाराष्ट्र पोलिस दलातील सोहेल काझी, सिनेचित्रपट अभिनेते गणेश पदमाळे, वानवडीच्या माजी नगरसेविका हसीना इनामदार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. राज्यभरात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरण आणि जनकल्याणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना या सोहळ्यात सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष कैलास पठारे यांनी दिली.

# अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेकडून अभिवादन

नगर – महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या कार्याचा, दूरदृष्टीचा आणि राज्याच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला तसेच उपस्थितांनी त्यांच्या स्मृतींना आदरांजली वाहिली.



अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुक्तेकर, उपायुक्त मेहेर लहारे, अभियंता परिमल निकम, इंजिनिअर सुरेश इथापे, गणेश गाडळकर, आदित्य बल्लाळ, गणेश पुंड, राजेंद्र मेहत्रे, अनिल लोंढे यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर अहिल्यानगर शहराच्या विकासाचेही मोठे नुकसान झाले. त्यांच्या माध्यमातून आमदार संग्राम जगताप यांनी शहराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला होता. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे अनेक विकासकामांना गती मिळाली. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी अहोरात्र झटणारे, निर्णयक्षम आणि विकासाला प्राधान्य देणारे नेतृत्व आज आपल्यात नसल्याची खंत आजही प्रत्येकाच्या मनात कायम असल्याचे त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, स्वर्गीय अजितदादा पवार यांनी विकासाला दिलेली दिशा, लोकाभिमुख कार्यपद्धती आणि जनतेशी जपलेली नाळ पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श समोर ठेवून समाजहिताची कामे पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

आयुक्त यशवंत डांगे यांनीही स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. राज्याच्या विकासात आणि प्रशासनाला दिशा देण्यात त्यांच्या योगदानाचे स्मरण करून त्यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करत त्यांच्या लोकाभिमुख कार्याला आदरांजली वाहिली.

# नाइट वॉचमन ते मेजर!

अरुणाचल प्रदेशातील पतकाईच्या दुर्गम भागात राहणाऱ्या 'वांचो' समुदायाची चर्चा आज देशभरात होत आहे. कारण या समुदायातील एका मुलाने आज सैन्यात 'मेजर' पदापर्यंत मोठी झेप घेतली आहे. आर्थिकदृष्ट्या अत्यंत कमकुवत असलेल्या वांचो कुटुंबातील या तरुणाने प्रतिकूल परिस्थितीशी लढा देत हे स्थान मिळवले आहे. मेजर लायचॅट पॉल वांगपान यांची ही सक्सेस स्टोरी आज हजारो-लाखो तरुणांसाठी एक आदर्श बनली आहे. देश आज त्यांचा संघर्ष, मेहनत आणि यशाला सलाम करत आहे.

मेजर लायचॅट पॉल वांगपान हे अरुणाचल प्रदेशच्या लोंगडिंग जिल्ह्यातील लोंगफोंग गावच्या अत्यंत गरीब कुटुंबातील आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत येथील लोक बांबू, लाकूड आणि पानांनी बनवलेल्या घरांमध्ये राहत असत. वीज आणि पाण्यासारख्या मूलभूत सुविधांसाठीही त्यांना संघर्ष करावा लागत असे. अर्थात अलीकडच्या काळात परिस्थिती सुधारत आहे. गरिबीमुळे वांगपान यांना अगदी लहान वयातच जबाबदाऱ्यांची जाणीव झाली होती. घराची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने कुटुंबाला हातभार लावण्यासाठी त्यांना आठवीत असतानाच शाळा सोडावी लागली होती. आयुष्य कठीण होत आणि संधी कमी होत्या; पण हार मानणे हा पर्याय त्यांच्याकडे कधीच नव्हता. घराचा खर्च चालवण्यासाठी वांगपान यांनी नाईट वॉचमन म्हणून काम सुरू केले. सीमा रस्ते संघटनेअंतर्गत (बीआरओ) जनरल रिझर्व्ह इंजिनिअर फोर्समध्ये ते नाईट वॉचमन होते.



रात्रीच्या अंधारात पहारा देणाऱ्या तरुण लायचॅट पॉल वांगपान मनातल्या मनात एक मोठे स्वप्न जपत होते. उत्तम भविष्य घडवण्याच्या पक्क्या इराद्याने ते भारतीय सैन्यात भरती झाले आणि त्यांनी पहिल्यांदा वर्दी परिधान केली. अनेक अडचणी असूनही वांगपान यांनी आपला दृढनिश्चय सोडला नाही आणि अभ्यास सुरू ठेवला. आपले कर्तव्य बजावत असतानाच त्यांनी अभ्यास केला आणि सेवा निवड मंडळाच्या (एसएसबी) परीक्षेची तयारी केली. त्यांच्या कष्टाला यश मिळाले आणि चेन्नई येथील 'ऑफिसर्स ट्रेनिंग ॲकॅडमी'मध्ये (ओटीए) 'प्री-कमिशन ट्रेनिंग'साठी त्यांची निवड झाली.

जून २०२० मध्ये लायचॅट पॉल वांगपान यांनी

**मेजर लायचॅट पॉल वांगपान हे अरुणाचल प्रदेशच्या लोंगडिंग जिल्ह्यातील लोंगफोंग गावच्या अत्यंत गरीब कुटुंबातील आहेत. काही वर्षांपूर्वीपर्यंत येथील लोक बांबू, लाकूड आणि पानांनी बनवलेल्या घरांमध्ये राहत असत. वीज आणि पाण्यासारख्या मूलभूत सुविधांसाठीही त्यांना संघर्ष करावा लागत असे. गरिबीमुळे वांगपान यांना अगदी लहान वयातच जबाबदाऱ्यांची जाणीव झाली होती. घराची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने कुटुंबाला हातभार लावण्यासाठी त्यांना आठवीत असतानाच शाळा सोडावी लागली होती.**



अचिव्हर

आपले ट्रेनिंग यशस्वीरित्या पूर्ण केले आणि सैन्यात 'लेफ्टनंट' झाले. तो क्षण अरुणाचल प्रदेशसाठी एक ऐतिहासिक क्षण होता, कारण वांगपान हे सैन्यात अधिकारी बनणारे त्यांच्या 'वांचो' समुदायातील पहिले व्यक्ती ठरले. त्यांची नियुक्ती 'शिख लाइट इन्फंट्री' रेजिमेंटमध्ये करण्यात आली. देशसेवा आणि कर्तव्याशी एकनिष्ठ असणाऱ्या लेफ्टनंट वांगपान यांना जून २०२६ मध्ये 'मेजर' पदावर प्रमोशन देण्यात आले. आज संपूर्ण देश त्यांचा संघर्ष, परिश्रम आणि यशाला सलाम करत आहे.

# जोश

## शेर की जुबानी

इन अजनबी सी राहों में,
जो तू मेरा हमसफर हो जाए,
बित जाए पल भर में ये वक्त,
और हसीन सफर हो जाए।

मैं चुप कराता हूं, हर
शब उमडती बारिश को,
मगर ये रोज, गई बात
छेड देती है।

राज खोल देते हैं नाजुक
से इशारे अक्सर, कितनी
खामोश मोहब्बत की
जुबान होती है।

## ॲप वर्ल्ड

### नवीन व्हॉट्सॲप चॅटबॉट




आयुष्मान भारत योजनेच्या लाभार्थ्यांसाठी एक आनंदाची आणि महत्त्वाची बातमी आहे. आता आयुष्मान कार्ड तयार करण्यासाठी किंवा योजनेशी संबंधित इतर कामांसाठी सरकारी कार्यालयात फेऱ्या मारण्याची किंवा कॉल सेंटरवर ताटकळत राहण्याची गरज पडणार नाही. केंद्र सरकारने लाभार्थींच्या सुविधेसाठी 'आयुष्मान सारथी' नावाचा एक नवीन व्हॉट्सॲप चॅटबॉट सुरू केला आहे.

या चॅटबॉटमुळे लोकांना २४ तास कधीही आणि सोप्या पद्धतीने आरोग्य सेवांची माहिती आणि लाभ मिळवता येईल. या व्हॉट्सॲप चॅटबॉटच्या माध्यमातून या योजनेसाठी पात्र आहात की नाही, हे पाहता येते. नवीन कार्डसाठी अर्ज करणे, ई-केवायसी करणे आणि कार्ड डाउनलोड करणे, आयुष्मान कार्डला आधार कार्ड जोडणे अशी कामे त्यावर करता येतात.

## टेक्नो टॉक

### कोणती ग्लास मजबूत?



आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोन आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. अशा परिस्थितीत फोन हातातून पडून त्याची स्क्रीन फुटल्यास दुरुस्तीसाठी हजारो रुपये खर्च करावे लागू शकतात. त्यामुळे बहुतांश वापरकर्ते स्क्रीनच्या सुरक्षेसाठी टेम्पर्ड ग्लास किंवा इतर स्क्रीन प्रोटेक्टरचा वापर करतात; मात्र बाजारात उपलब्ध असलेल्या विविध पर्यायांमुळे नेमकी कोणती ग्लास सर्वाधिक सुरक्षित आणि टिकाऊ आहे, याबाबत अनेकांचा संभ्रम असतो.


मोबाईल स्क्रीनच्या सुरक्षेसाठी सॅफायर ग्लास सर्वात मजबूत मानली जातो. ही ॲल्युमिनियम ऑक्साइडपासून तयार केली जाते आणि तिची कठोरता हिऱ्यानंतर सर्वाधिक असल्याचे मानले जाते; मात्र तिची किंमत जास्त असल्याने ती प्रामुख्याने प्रीमियम स्मार्टफोन आणि महागड्या उपकरणांमध्ये वापरली जाते.

बहुतांश स्मार्टफोनमध्ये गोरिला ग्लास वापरली जातो. ही ग्लास स्क्रीनला ओरखडे आणि पडल्यामुळे होणाऱ्या नुकसानीपासून चांगले संरक्षण देते. विशेष रासायनिक प्रक्रियेद्वारे तयार करण्यात येणारी ही ग्लास टिकाऊपणा आणि मजबुतीसाठी ओळखली जाते. याशिवाय 'ड्रॅगनट्रेल ग्लास' ही ही गोरिला ग्लासप्रमाणेच मजबूत आणि टिकाऊ मानली जातो. ती वेगळ्या रासायनिक प्रक्रियेद्वारे तयार केली जाते. तसेच 'ॲल्युमिनोसिलिकेट ग्लास'अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि स्मार्टफोनमध्ये वापरली जाते. अधिक तापमान सहन करण्याची क्षमता हे तिचे वैशिष्ट्य आहे.

'टेम्पर्ड ग्लास' खरेदी करताना केवळ किंमत पाहून निर्णय घेऊ नका. '९ एच' हार्डनेस रेटिंग असलेली ग्लास अधिक मजबूत मानली जाते आणि ओरखड्यांपासून चांगले संरक्षण देते. तसेच ग्लासवर 'ओलिओफोबिक कोटिंग' असल्यास स्क्रीनवर बोटांचे ठसे आणि तेलकट डाग कमी दिसतात. याशिवाय '२.५ डी' किंवा 'थ्री डी एज डिझाइन' असलेली ग्लास स्क्रीनच्या कडांपर्यंत चांगले संरक्षण देते. किमान ९९ टक्के पारदर्शकता आणि उत्तम 'टच सेन्सिटिव्हिटी' असलेली ग्लास निवडणेही महत्त्वाचे आहे.

बाजारात टेम्पर्ड ग्लास, टीपीयू, पेट आणि नॅनो लिक्विड असे विविध प्रकारचे 'स्क्रीन प्रोटेक्टर' उपलब्ध आहेत. यापैकी 'टेम्पर्ड ग्लास' सर्वाधिक मजबूत मानली जातो. ती पडल्यास किंवा ओरखडे आल्यास स्क्रीनचे प्रभावी संरक्षण करते. 'टीपीयू प्रोटेक्टर' हलक्या ओरखड्यांपासून बचाव करतो. 'पेट' हा स्वस्त आणि हलका पर्याय असला तरी त्याचे संरक्षण मर्यादित असते. 'नॅनो लिक्विड' स्क्रीनवर संरक्षक थर तयार करते; मात्र, टेम्पर्ड ग्लासइतके मजबूत संरक्षण ते देत नाही.

# लग्न ठरत नाही...



मी २९ वर्षांचा तरुण असून बँकेत चांगल्या पदावर नोकरी करतो. मी दिसायला चारचौघांसारखाच आहे. गेल्या वर्षभरापासून माझ्यासाठी वधूसंशोधन सुरू आहे. पालकांनी यासाठी पुढाकार घेतला आहे. सर्वतोपरी प्रयत्न करूनही माझं लग्न ठरत नाही. आम्ही वर्तमानपत्रांमध्ये जाहिराती दिल्या आहेत. विविध मॅट्रिमोनिअल साईट्सवरही नाव नोंदवलं आहे. कधी पत्रिका जुळत नाहीत तर कधी स्वभाव न जुळल्यामुळे बोलणी फिस्कटतात. मी एका सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबातला मुलगा आहे. आर्थिकदृष्ट्याही स्थिरस्थावर आहे. त्यामुळे आता लग्न करायचं आहे. पण लग्न ठरण्यात येणाऱ्या अडचणींमुळे मी खूप अस्वस्थ आहे. अनेकदा मला खूप निराश वाटतं आणि मी नियतीला दोष देत बसतो. माझ्यावर मनापासून प्रेम करणारी मुलगी कधीच मिळणार नाही, असं आता वाटू लागलं आहे. मी काय करू?

**उत्तर** : सुयोग्य जोडीदार कधी मिळेल, हे कोणीच ठामपणे सांगू शकणार नाही.

मॅच मेकिंग

सद्यपरिस्थितीत तू स्वतःला वेळ दे. स्वविकास करण्याचा प्रयत्न कर. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी असणं आणि सुशिक्षित, पुढारलेल्या कुटुंबाचा भाग असणं या तुझ्या जमेच्या बाजू आहेत. सततच्या अपयशामुळे खचणं, नैराश्य येणं स्वाभाविक आहे. यातून बाहेर पडण्यासाठी समुपदेशकांची मदत घेता येईल. सोशल मीडियाच्या माध्यमातून तू समविचारी लोकांशी संवाद साध. नव्या लोकांना भेटण्यासाठी काही ग्रुप्समध्ये सहभागी हो. लग्न ही जन्मभराची कमिटमेंट आहे. गोष्टी जुळून यायला वेळ लागतो. तू धीर सोडू नकोस. मुख्य म्हणजे उतावळेपणाने कोणताही निर्णय घेऊ नकोस. तुला मनासारखा जोडीदार नक्कीच मिळेल.

# आरोग्य विभागात नवीन पदे मंजूर



महाराष्ट्र सरकारने राज्यातील आरोग्यसेवा अधिक मजबूत करण्यासाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत, ज्या २५९ नवीन आणि श्रेणी सुधारित आरोग्य संस्थांचे बांधकाम ५० टक्क्यांहून अधिक पूर्ण झाले आहे. त्यामध्ये ५,२२३ नवीन पदांच्या निर्मितीला मंजुरी देण्यात आली आहे. या पदांसाठी ३२०.०१ कोटी रुपयांच्या वार्षिक खर्चालाही मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे ठाणे, नाशिक, बीड, अकोला, पुणे, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर यासह अनेक जिल्ह्यांमधील रुग्णालयांमध्ये डॉक्टर, परिचारिका आणि इतर कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढेल. यामुळे आरोग्य सेवांना गती मिळेल आणि रुग्णांना उत्तम आरोग्यसेवा मिळेल.

राज्यातील ज्या २५९ आरोग्य संस्थांचे बांधकाम ५० टक्के किंवा त्याहून अधिक पूर्ण झाले आहे. त्यांच्यासाठी एकूण ७,९५५ पदांची आवश्यकता होती. यापैकी २,७३२ पदांना आधीच मंजुरी देण्यात आली होती, तर उर्वरित ५,२२३ नवीन पदांना आता संबंधित आरोग्य संस्थांच्या निर्मिती आणि कार्यान्वयनासाठी मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयाअंतर्गत, ठाणे जिल्हा रुग्णालयाची क्षमता ३३६ वरून ५०० खाटांपर्यंत वाढवणे, बीड जिल्हा रुग्णालयाचा ३०० वरून ५०० खाटांपर्यंत विस्तार करणे, तसेच ठाणे संदर्भ सेवा रुग्णालय, ठाणे महिला रुग्णालय, अकोला जिल्हा रुग्णालय, मंचर-आंबेगाव सामान्य रुग्णालय, इचलकरंजी सामान्य रुग्णालय आणि नाशिक संदर्भ सेवा रुग्णालय यांसह अनेक संस्थांमध्ये नवीन पदे मंजूर करण्यात आली आहेत.

रोजगार संधी

बदलत्या आरोग्यसेवा गरजा पूर्ण करण्यासाठी, नाशिक रेफरन्स सर्व्हिस हॉस्पिटलमध्ये न्यूरोलॉजिस्ट, न्यूरोसर्जन, रेडिओलॉजिस्ट, बायोमेडिकल इंजिनिअर, ईईजी आणि ईएमजी टेक्निशियन यांसारख्या अनेक जुन्या विशेषज्ञ पदांच्या जागी नवीन विशेषज्ञ पदे निर्माण करण्यात आली आहेत. याव्यतिरिक्त, १३ ग्रामीण रुग्णालयांचे ३० ते ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयांमध्ये, सहा ग्रामीण रुग्णालयांचे ३० ते १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयांमध्ये आणि सहा उपजिल्हा रुग्णालयांचे ५० ते १०० खाटांच्या उप-जिल्हा रुग्णालयांमध्ये श्रेणीवाढ करण्यासाठीदेखील पदे निर्माण करण्यात आली आहेत .

नवीन महिला रुग्णालये, पाच ट्रॉमा केअर युनिट्स, चार आयुष रुग्णालये, १३ नवीन ग्रामीण रुग्णालये, १५८ उपकेंद्रे, ३८ गैर-आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रे, तीन आदिवासी प्राथमिक आरोग्य केंद्रे, करमद येथील राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र आणि राज्यस्तरीय औषध भांडारांसाठीही नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. संबंधित आरोग्य संस्थांमधील नेमणुका इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने भोगवटा प्रमाणपत्र जारी केल्यानंतरच केल्या जातील. जर कोणत्याही संस्थेमध्ये पूर्वी मंजूर केलेली पदे दुबार असल्याचे आढळल्यास, शासकीय मंजुरीनंतर ती रद्द केली जातील.

# दंतवैद्यकीयसाठी बायोमॅट्रिक सक्तीचे

देशभरातील पदव्युत्तर (पीजी) दंतवैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक उपस्थिती संदर्भात आता कठोर नियम लागू झाले आहेत. 'नॅशनल डेंटल कमिशन' (एनडीसी) ने सगळ्या डेंटल कॉलेजेसना विद्यार्थ्यांची किमान ८० टक्के बायोमेट्रिक उपस्थिती अनिवार्य करण्याचे आदेश दिले आहेत. हा निकष पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या परीक्षेला बसण्याची संधी दिली जाणार नाही.



उच्च शिक्षण

आयोगाने १९ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या सूचनांची पुन्हा आठवण करून दिली आहे. तसेच उपस्थितीचे नियम काटेकोरपणे पाळण्याची जबाबदारी संबंधित कॉलेजेसची असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. 'मास्टर ऑफ डेंटल सर्जरी' (एमडीएस) अभ्यासक्रम चालवणाऱ्या सगळ्या डेंटल कॉलेजेसनी विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक उपस्थिती तपासल्यानंतरच त्यांना विद्यापीठाच्या किंवा पदव्युत्तर परीक्षेसाठी पात्र ठरवावे, असे आयोगाने सांगितले आहे. ज्या विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक उपस्थिती ८० टक्क्यांपेक्षा कमी असेल, त्यांना परीक्षेला बसण्याची परवानगी देऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत आयोगाने यासंदर्भात कॉलेजेसना इशारा दिला आहे. कमी उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू दिल्यास, त्याची पूर्ण जबाबदारी त्या संबंधित कॉलेजेसवरच राहील. अशा प्रकारे वागणाऱ्या संस्थांनी आयोगाच्या नियमांचे उल्लंघन केलेले मानले जाईल.


ही उपस्थिती संबंधीची अट डीसीआय एमडीएस कोर्स रेग्युलेशन्स, २०१७ मधील नियम १८(अ)(१) नुसार लागू होते. विद्यार्थ्यांच्या पात्रतेचा निर्णय घेण्यासाठी बायोमेट्रिक उपस्थितीची नोंद ही अधिकृत आधार म्हणून स्वीकारली जाईल. आयोगाने सगळ्या डेंटल कॉलेजेसवरवर कोणतीही सवलत न देता या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. पदव्युत्तर दंतवैद्यकीय शिक्षणात नियमित उपस्थिती आणि प्रत्यक्ष क्लिनिकल प्रशिक्षणाला असलेले महत्त्व लक्षात घेऊनच हा निर्णय घेण्यात आल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

# कायम 'इन स्टाइल' पांढरा शर्ट

पांढरा शर्ट हा प्रत्येक पुरुषाच्या वॉर्डरोबमधील असा एक कपडा आहे, जो कधीही 'आउट ऑफ फॅशन' होत नाही. त्याची साधी, आकर्षक आणि क्लासिक शैली हेच त्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. एकाच पांढऱ्या शर्टला वेगवेगळ्या पद्धतीने स्टाइल करून ऑफिस, पार्टी, डेट किंवा कॅज्युअल आउटिंग अशा प्रत्येक प्रसंगासाठी वेगळा आणि उठावदार लूक मिळवू शकतो.

आरामदायी आणि स्टायलिश लूक हवा असेल, तर पांढऱ्या शर्टसोबत ब्लू किंवा डार्क जीन्स हा उत्तम पर्याय आहे. यासोबत हलक्या तपकिरी रंगाचा बेल्ट आणि कॅज्युअल शूज परिधान केल्यास लूक अधिक आकर्षक दिसतो. डेट, मित्रांसोबतची भेट किंवा सेमी-फॉर्मल कार्यक्रमांसाठी हे कॉम्बिनेशन योग्य ठरते. औपचारिक कार्यक्रमांसाठी पांढरा शर्ट आणि काळा सूट हे सदाबहार कॉम्बिनेशन मानले जाते. नीट इस्त्री केलेला शर्ट, फिटिंगची पँट, काळे फॉर्मल शूज आणि टाय यामुळे व्यक्तिमत्त्व अधिक प्रभावी आणि व्यावसायिक दिसते. ऑफिस मीटिंगपासून ते समारंभ आणि पार्ट्यांपर्यंत हा लूक सहज खुलतो.

अतिशय फॉर्मल किंवा खूप कॅज्युअल न वाटणारा संतुलित लूक हवा असेल, तर ग्रे पँटसोबत पांढरा शर्ट परिधान करा. यासोबत ब्लेझर घातल्यास लूक अधिक स्टायलिश होतो, तर ब्लेझरशिवायही हा पोशाख स्मार्ट आणि आरामदायी दिसतो. नेव्ही ब्लेझर आणि पांढरा शर्ट हे एलिगंट कॉम्बिनेशन मानले जाते. बिझनेस मीटिंग, स्मार्ट कॅज्युअल कार्यक्रम किंवा विशेष प्रसंगी हा लूक प्रभावी ठरतो. टायसह किंवा टायशिवाय दोन्ही प्रकारे हा पेहराव आकर्षक दिसतो. सेमी-फॉर्मल आणि कॅज्युअल लूकमध्ये संतुलन साधायचे असेल, तर खाकी पँट आणि पांढरा शर्ट हा उत्तम पर्याय आहे.



फॅशन पॅशन

शर्टच्या बाह्या हलक्या दुमडल्यास रिलॅक्स लूक मिळतो, तर शर्ट पँटमध्ये खोचून परिधान केल्यास अधिक शार्प आणि नीटनेटका लूक तयार होतो. साध्या पांढऱ्या शर्टला आधुनिक टच द्यायचा असेल, तर स्टायलिश शूज किंवा स्नीकर्सची निवड करा. यासोबत आकर्षक घड्याळ, बेल्ट किंवा इतर हलक्या ॲक्सेसरीज वापरल्यास संपूर्ण लूक अधिक उठून दिसतो. शर्टच्या बाह्या थोड्या दुमडल्यास व्यक्तिमत्त्वात कॅज्युअल आणि ट्रेंडी अंदाज दिसून येतो. आपल्या शरीरयष्टीला अनुरूप फिटिंगचा शर्ट निवडा. योग्य कॉम्बिनेशन, उत्तम फिटिंग आणि आत्मविश्वास या तीन गोष्टींच्या जोरावर साधा पांढरा शर्टही तुमचे व्यक्तिमत्त्व अधिक स्टायलिश आणि प्रभावी बनवू शकतो.

# भारतातील पाच वॉटर पॅलेस

भारतातील भव्य आणि ऐतिहासिक राजवाडे म्हटले, की उंच टेकड्या, वाळवंट किंवा मोठे किल्ले आठवतात. देशात काही असेही राजवाडे आहेत, जे चारी बाजूंनी पाण्याने वेढलेले आहेत! राजा-महाराजांनी उन्हाळ्यातील विश्रांतीसाठी किंवा मनोरंजनासाठी बांधलेले हे 'वॉटर पॅलेस' भारतीय इंजिनिअरिंग आणि सौंदर्याचा अद्भूत नमुना आहेत.




**जलमहाल, जयपूर (राजस्थान)**

जयपूरच्या 'मान सागर' तलावाच्या मध्यभागी असलेला जलमहाल हा राजस्थानातील एक प्रमुख आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. १८व्या शतकात महाराजा माधोसिंह (पहिले) यांनी हा राजवाडा शिकारीची जागा आणि विश्रांतीसाठी बांधला होता. जेव्हा हा तलाव पूर्ण भरतो, तेव्हा या पाच मजली इमारतीचे तब्बल चार मजले पाण्याखाली जातात! त्यामुळे हा वाडा पाण्यावर तरंगत असल्याचा भास होतो. तलावाच्या किनाऱ्यावरून दिसणारे याचे दृश्य मनाला भुरळ पाडते.

**ताज लेक पॅलेस, उदयपूर (राजस्थान)**



उदयपूरच्या 'पिचोला' तलावात शुभ्र संगमरवरी दगडांनी बांधलेला हा राजवाडा म्हणजे सौंदर्याचा कळस आहे. १७४३ ते १७४६ दरम्यान महाराणा जगतसिंह (दुसरे) यांनी आपली उन्हाळी सुटी घालवण्यासाठी हा वाडा बांधला होता. त्याला आधी 'जग निवास' म्हटले जायचे. आज हा राजवाडा जगातील सर्वात आलिशान 'हेरिटेज हॉटेल' म्हणून ओळखला जातो. येथील कोरीव काम आणि बाल्कनीतून दिसणारा उदयपूरचा नजराणा पर्यटकांना थक्क करतो.



**नीरमहाल, त्रिपुरा**

पूर्व भारतातील सर्वात मोठा 'वॉटर पॅलेस' म्हणून त्रिपुराचा 'नीरमहाल' ओळखला जातो. 'रुद्रसागर' तलावाच्या अगदी मध्यभागी असलेला हा राजवाडा १९३० मध्ये त्रिपुराचे शेवटचे राजे महाराजा बीर बिक्रम किशोर माणिक्य बहादूर यांनी बांधला होता. हिंदू आणि मुगल वास्तुकलेचा हा एक सुरेख मिलाफ आहे. या राजवाड्यात जाण्यासाठी बोटीचा प्रवास करावा लागतो. तसेच दरवर्षी येथे भरणारा 'नीरमहाल वॉटर फेस्टिव्हल' पाहण्यासारखा असतो.

**जय विलास पॅलेस, ग्वाल्हेर (मध्य प्रदेश)**



ग्वाल्हेरचा भव्य 'जय विलास पॅलेस' आज पूर्णपणे पाण्याने वेढलेला नसला, तरी त्याची रचना पाण्याच्या कारंज्यांनी आणि सुंदर तलावांनी वेढलेली आहे. १८७४ मध्ये महाराजा जयाजीराव शिंदे यांनी युरोपीय शैलीत हा राजवाडा बांधला. या राजवाड्यात इटालियन आणि टस्कन स्थापत्यकलेची झलक पाहायला मिळते. याच्या 'दरबार हॉल'मध्ये जगातील सर्वात मोठे आणि जड झुंबर लावलेले आहेत. उन्हाळ्यात राजवाडा थंड ठेवण्यासाठी पाण्याचा वापर कसा केला जायचा, याचे हे उत्तम उदाहरण आहे.

भटकंती



**बेकल पॅलेस आणि वॉटरफ्रंट वास्तू, केरळ**

उत्तर भारतासारखे संगमरवरी दगड न वापरता, केरळच्या राजांनी स्थानिक हवामानानुसार लाकूड आणि उतरत्या छपरांचा वापर करून जलकुंभांच्या कडेला सुंदर राजवाडे आणि वाडे बांधले आहेत. केरळच्या बॅकवॉटर आणि नद्यांच्या किनाऱ्यावर वसलेल्या या वास्तू निसर्गाच्या अगदी जवळ आहेत. पारंपरिक लाकडी कोरीव काम आणि शांत पाण्याचा परिसर यामुळे या वास्तूंचे सौंदर्य अधिकच खुलून दिसते.

# ‘रोटरी इंटिग्रेटी’च्या अध्यक्षपदी डॉ. सईद शेख, सचिवपदी परदेशी

नगर – रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर इंटिग्रेटीच्या नूतन कार्यकारिणीची नुकतीच घोषणा करण्यात आली असून, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर इंटिग्रेटीच्या आठव्या पदग्रहण सोहळ्यात नूतन पदाधिकाऱ्यांनी हृदयरोगतज्ज्ञ डॉ. एस. एस. दीपक यांच्या हस्ते पदभार स्वीकारला. नूतन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदाची सूत्रे रो. डॉ. सईद शेख यांनी तर रो. उदयभानसिंग परदेशी यांनी सचिवपद, तर रोटेरियन हेमंत लोगावकर यांनी खजिनदारपदाची सूत्रे स्वीकारली.



रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर इंटिग्रेटीचा ८ वा पदग्रहण सोहळा हृदयरोग तज्ञ डॉ. एस. एस. दीपक यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. (छाया – समीर मन्यार)

यावेळी मावळत्या अध्यक्ष रो. शुभश्री पटनाईक, निखिल कुलकर्णी, रवी डिक्रुझ, चंदना गांधी, भरत कुकरेजा,राजीव चिटगोपेकर मयूर राहींज, अभिषेक शेटे, प्रणित अनमल, प्रियंका चिखले आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. दीपक म्हणाले, रोटरीची खरी ताकद ही तिच्या भव्य इमारतींमध्ये किंवा आर्थिक सामर्थ्यात नसून समाजासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या सेवाभावी सदस्यांमध्ये आहे. सर्व्हिस अबव्ह सेल्फ हे तत्त्व जपत रोटरी समाजात सकारात्मक परिवर्तन घडवत आहे. आजारांवर उपचार करण्यापेक्षा प्रतिबंधात्मक आरोग्याची चळवळ उभारणे ही काळाची गरज आहे. तरुणांनी मोठ्या संख्येने रोटरीच्या सामाजिक चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी असिस्टंट गव्हर्नर रो. हरीश नय्यर यांनी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. जयेश पटेल यांचा संदेश वाचून दाखवला. नवनिर्वाचित अध्यक्ष रो.डॉ. सईद शेख यांनी आगामी वर्षात कर्करोग जनजागृती, प्रतिबंधात्मक आरोग्य, पर्यावरण संवर्धन, कचरा व्यवस्थापन, प्लास्टिकमुक्ती, आरोग्य तपासणी शिबिरे तसेच शिक्षण व महिला–बालकल्याणाशी संबंधित विविध समाजोपयोगी प्रकल्पांना प्राधान्य देण्याचा संकल्प व्यक्त केला. मावळते सचिव निखिल कुलकर्णी यांनी गतवर्षातील विविध सामाजिक, आरोग्य व सेवा उपक्रमांचा आढावा घेत नव्या कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. मावळत्या अध्यक्षा रोटेरियन सुभश्री पटनाईक, सचिव निखिल कुलकर्णी व त्यांच्या टीमने वर्षभरात राबविलेल्या समाजोपयोगी उपक्रमांचे उपस्थितांनी कौतुक केले. सूत्रसंचालन रो. चंदन शहा–गांधी यांनी केले. रो. उदयभानसिंग परदेशी यांनी आभार मानले.



## गुरुवाणी २
## गुरू चरणी लीन व्हा...

आषाढी पौर्णिमा परिवर्तनाच्या दिवस आहे. तीर्थ स्थापनेचा हा दिवस. गुरू विना आयुष्य अपूर्ण आहे. गुरूला शोधण्याची गरज नाही, गुरूच तुम्हाला शोधतो. जसे दगडातून देव साकारण्यासाठी मूर्तीकारच दगड शोधतो. आपल्याकडं गुरूची कदर होत नाही ही शोकांतिका आहे. अनेकदा अर्जुनाप्रमाणे गुरू द्रोणाचार्यांविरोधात सुद्धा लढले जाते. त्याचवेळी द्रोणाचार्यांनी एकलव्याचे समर्पण नाकारले पण त्यानेच गुरूसाठी मोठा त्याग केला. तुम्ही कोणत्या गुरूला स्विकारता हे महत्त्वाचे आहे. एकलव्याने द्रोणाचार्यांची ओबडधोबड मूर्ती बनवली पण त्याच्या हृदयात जिवंत गुरू होते. एकलव्याला द्रोणाचार्यांनी प्रत्यक्ष काहीच शिकवले नाही. पण तो हृदयाने श्रद्धा ठेऊन शिकला. जो कुशलतेने विद्या ग्रहण करतो तोच खरा शिष्य. एकलव्याकडे ते सामर्थ्य होते. आचार्य मानतुंग तुरुंगात होते पण त्यांची प्रथम तीर्थंकर भगवान ऋषभदेव यांच्यावरील नितांत श्रद्धा कमी झाली नाही. बेड्यांनी जखडलेले असताना त्यांनी गुरू भक्ती सोडली नाही. असे आचार्य मानतुंग गुरूकृपेनेच घडतात. गुरू असावा तीर्थंकर महावीर यांच्या सारखा तर शिष्य असावा गौतम स्वामींसारखा. ना झुके गुरू चरणो में वो सर तो सर ही नहीं. ग्रहण करण्याचे सामर्थ्य ज्यात असते तो शिष्य असतो. त्यामुळेच गुरू पौर्णिमा हा बीजारोपण होण्याचा दिवस आहे. समोरच्याला न दुखावता त्याला शांत करण्याची कला यायला हवी. जसे एकलव्याने भुंकणाऱ्या कुत्र्याला जखमी न करता त्याचे भुंकणे आपल्या बाणांनी बंद केले. त्याची ही कला आणि त्याची कहाणी ऐकून द्रोणाचार्य आश्चर्यचकित झाले. ते म्हणाले, ’मी तर तुला शिकवले नाही’. एकलव्य म्हणाला, ’मी तर तुमच्याकडूनच शिकलो’. आपल्याकडे उलट परिस्थिती आहे. आपण आपल्या चुकीला इतरांना दोष देतो. मनुष्याची वेळ खराब नसते. मनुष्याचे कर्म खराब असते. जग कोणाला मजबूर नाही करत पण आपण एकमेकांना मजबूर करत असतो. द्रोणाचार्यांनी सुद्धा एकलव्याचे कौतुक न करता त्याला मजबूर केले आणि गुरू दक्षिणेत ’अंगठा’ मागितला. पण एकलव्याने क्षणाचाही विचार न करता आपल्या हाताचा अंगठा कापून दिला. यानंतरही एकलव्य थांबला नाही. अंगठा नसूनही श्रद्धा कायम ठेवत त्याने आपली धनुर्विद्या कला आणखी वृद्धिंगत केली. वाहत्या पाण्याला कोणी थांबवू शकत नाही. दगडाला एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्यापासून रोखता येते. ज्याला रोखूनही रोखता येत नाही असे पाण्यासारखे प्रवाही आपल्याला बनायचं आहे. म्हणूनच गुरूचरणी लीन व्हा दुसऱ्या कोणाच्या चरणांची गरज पडणार नाही.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# पंढरीच्या वारी मार्गावर पंढरपूरपर्यंत पोहोचून वारकऱ्यांसाठी चवंडके यांच्याकडून अन्नदान

नगर – पंढरीच्या वारी मार्गावर पंढरपूरपर्यंत पोहोचून वारकऱ्यांसाठी मिलिंद चवंडके हे अन्नदान करीत आहेत. वारी मार्गावर पंढरपूरपर्यंत एकदा नव्हे तर चार –पाच वेळा येऊन वारकऱ्यांना आवश्यक शिधा पोहोच करण्याची सेवा करणारे मिलिंद चवंडके हे आषाढी वारी सोहळ्याच्या इतिहासातील एकमेव असावेत. त्यांची ही अन्नदान शिधासेवा ही अत्यंत अलौकीक समष्टी साधनाच आहे, अशा शब्दात श्री संत मुक्ताबाई पालखीचे प्रमुख हभप मंगेश महाराज जळगावकर यांनी चवंडके यांचे कौतुक केले.

चवंडके हे गेल्या २१ वर्षापासून वारीतील वारकऱ्यांना शिधा वाटप करीत आहेत. तसेच थकलेल्या वारकऱ्यांच्या पायांना आयुर्वेदिक तेलाने स्वतः मालिश करून देतात. प्रथमोपचाराचे साहित्य आणि थंडी, ताप, जुलाब, अंगदुखी यावर औषधेही पुरवतात. वारकऱ्यांमध्ये विठुरायाला पहाण्याचा आनंद घेत त्यांची ही सेवा सुरु आहे.



वारीमध्ये वारकऱ्यांना भेटून शिधा देताना मिलींद चवंडके व इतर.

वारीदरम्यान हभप मंगेश महाराज जळगावकर यांची त्यांनी भेट घेवून सेवा केली. यावेळी जळगावकर महाराजांनी चवंडके यांच्या कार्याचे चौतुक केले. यावर्षी महाअन्नदान सेवेसाठी हभप निळकंठ महाराज देशमुख, प्रवीण सोनी, अशोक कुरापाटी, नंदलाल मणियार, प्रमोद (पिटू) गांधी, संजय गेनाप्पा, महादन नामदे, विनायक लांडे, रघुनाथ ठोंबरे, डॉ.रोहित ढाकेफळकर, डॉ. पूर्वा ढाकेफळकर, डॉ. राजश्री वर्मा, वैद्य अनिकेत घोटणकर, चारूता मिस्किन, रेखाताई डोंगरे, भाग्यलक्ष्मी भट, प्रा. ज्योती कुलकर्णी, प्रकाश चंगेडिया, अनिल सोले, श्रीपाद शिंदीकर, सौरभ बोरूडे, पुरूषोत्तम सुपेकर, संदिप सुपेकर, अजिंक्य सुपेकर, देविदास जोग, सोन्याबापू मुदळ यांनी तसेच शरयू ताडपत्रीकर यांच्या स्मरणार्थ श्रीराम ताडपत्रीकर, शैलजा ताडपत्रीकर आणि निर्मला नाईक यांनीही सहाय्य केले.

आषाढी वारी महाअन्नदान सेवेत सहभागी झालेल्या सर्वांच्या सेवा विठुरायाच्या चरणी समर्पित करताना पुढील वर्षी अशाच सेवा घडू दे, अशी प्रार्थना मिलिंद महाराज चवंडके यांनी विठ्ठलाचरणी केली.

# शिष्यवृत्ती परीक्षेत सविता फिरोदिया प्रशालेतील चौथीचे ४४ तर सातवीचे १४ विद्यार्थी ठरले पात्र

नगर – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत एप्रिल २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत शिशु संगोपन संस्था संचालित सविता रमेश फिरोदिया प्रशालेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इयत्ता चौथीच्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत प्रशालेतील ५२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी तब्बल ४४ विद्यार्थी पात्र ठरले असून प्रशालेचा ८४.३ टक्के निकाल लागला आहे. तसेच यातील १८ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळवून विशेष कामगिरी केली आहे.

इयत्ता सातवीच्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतही प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची चमक दाखवली. या परीक्षेसाठी प्रशालेतील २१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १४ विद्यार्थी पात्र झाले असून प्रशालेचा ६६.६६ टक्के निकाल लागला आहे. विशेष म्हणजे सातवीच्या परीक्षेतही पाच विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळविले आहेत.

शिष्यवृत्ती परीक्षेतील या यशामुळे सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाबरोबरच स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करून देणे, सराव चाचण्या घेणे, विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर मार्गदर्शन करणे तसेच प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीकडे वैयक्तिक लक्ष देणे, या प्रयत्नांचा या निकालात मोठा वाटा असल्याचे दिसून येते.

इयत्ता चौथीच्या ५२ विद्यार्थ्यांपैकी ४४ विद्यार्थी पात्र ठरल्याने ८४.३ टक्के निकाल ही प्रशालेसाठी विशेष अभिमानाची बाब ठरली आहे. त्याचबरोबर १८ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळविल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची उंचीही अधोरेखित झाली आहे. इयत्ता सातवीमध्ये २१ विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थी पात्र होऊन ६६.६६ टक्के निकाल नोंदविला गेला असून पाच विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा अधिक गुण मिळविले आहेत.

शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा म्हणाले, शिष्यवृत्ती परीक्षेत सविता रमेश फिरोदिया प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यांचे फलित आहे. केवळ परीक्षेतील गुणांपेक्षा विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची गोडी, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक परीक्षांना सामोरे जाण्याची क्षमता निर्माण करणे महत्त्वाचे आहे. चौथी आणि सातवीच्या विद्यार्थ्यांनी पात्रतेची मिळविलेली ही कामगिरी प्रशालेच्या शैक्षणिक वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी संस्था प्रयत्नशील राहील.

प्रशालेच्या मुख्याध्यापिका योगिता गांधी तसेच सर्व सेवकवृंदांनी विद्यार्थ्यांच्या यशासाठी विशेष परिश्रम घेतले. प्रशालेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गुणवंत व पात्र विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे शिशु संगोपन संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र. धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ड. विजय मुनोत तसेच सर्व विश्वस्त व संस्था पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

चौथीच्या विद्यार्थ्यांना मनिषा कार्ले, शिल्पा खराडे, वैशाली पार्ले तसेच सातवीच्या विद्यार्थ्यांना रोहिणी कुलट, भाऊराव डोळस, जया हराळे आदी शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले.

# सीए अजय मुथा यांची नवी दिल्ली येथील डायरेक्ट टॅक्स कमिटीवर निवड



नगर – चार्टर्ड अकाउंटंट्स क्षेत्रातील सर्वोच्च संस्था असणाऱ्या द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय), नवी दिल्लीच्या अतिशय महत्त्वाच्या आणि प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या डायरेक्ट टॅक्स कमिटी (डीटीसी) वर अहिल्यानगर येथील सीए, आयपी अजय मुथा यांची सदस्यपदी निवड झाली आहे.

ही समिती प्रामुख्याने आयसीएआयच्यावतीने भारत सरकारचे अर्थ मंत्रालय आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ (सीबीडीटी) यांना इन्कम टॅक्स आणि कर प्रणालीबाबत अत्यंत महत्त्वाचे सल्ले व सूचना देण्याचे कार्य करते. सीबीडीटी ही देशातील अशी सर्वोच्च संस्था आहे, जी संपूर्ण इन्कम टॅक्स कायद्याचे नियंत्रण आणि संचालन करते.

केंद्रीय वित्त मंत्रालयाला अर्थ संकल्पापूर्वी तांत्रिक शिफारसी (प्री बजेट मेमरँडम) सादर करणे आणि बजेटनंतर (पोस्ट बजेट) सरकारला योग्य त्या सुधारणा करण्यासाठी सूचना केल्या जातात. देशात वेळोवेळी तयार होणारे आयकर कायदे, नियम व नोटिफिकेशन्सचा अभ्यास करून नागरिकांच्या आणि व्यापाऱ्यांच्या हितासाठी केंद्र सरकारला सुधारणा सुचवणे. शासकीय समितीसोबत समन्वय, आयकराशी संबंधित सीबीडीटीच्या विविध सरकारी समित्यांना तांत्रिक सल्ला आणि सहकार्य करणे. शासकीय प्रतिनिधी, सीबीडीटीचे उच्च अधिकारी आणि इन्कम टॅक्स अपील ट्रिब्युनलच्या(आयटीएटी) सदस्यांसोबत संयुक्त बैठका घेऊन कर प्रणालीतील अडचणी सोडवणे, सरकार व विविध वैधानिक संस्थांनी विचारलेल्या करांसंदर्भातील क्लिष्ट प्रश्नांवर अधिकृत मार्गदर्शक अभिप्राय देणे, सीए आणि कर सल्लागारांसाठी विविध मार्गदर्शन करणे तसेच करदाते आणि शासन यांच्यातील संवाद व सौहार्द अधिक प्रभावशाली करण्यात आयसीएआय महत्त्वाची भूमिका या कमिटीद्वारे बजावत असते.

सीए, आयपी अजय मुथा हे नगरमध्ये गेल्या ३० वर्षांहून अधिक काळापासून इन्कम टॅक्स व ऑडिट प्रोफेशनमध्ये यशस्वीपणे प्रॅक्टिस करत आहेत. प्रसिद्ध कर सल्लागार अमृतलाल पी. मुथा यांचे ते सुपुत्र आहेत. सन१९९३ मध्ये सीए इंटरमिडिएट परीक्षेत त्यांनी इन्कम टॅक्स या विषयात संपूर्ण भारतात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला होता. ते आयसीएआयच्या विकासा शाखेचे संस्थापक अध्यक्ष असून, अहमदनगर सीए शाखेचे माजी अध्यक्ष आहेत. अहमदनगर मर्चंट्स को–ऑपरेटिव्ह बँक (शेड्यूल्ड बँक) चे ते माजी चेअरमन असून, सध्या ते विद्यमान संचालक असून या बँकेच्या बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे चेअरमन म्हणूनही जबाबदारी सांभाळत आहेत. अहमदनगर जिल्ह्यातून इन्सॉल्व्हन्सी प्रोफेशनल म्हणून मान्यता मिळवणारे ते एकमेव प्रॅक्टीसींग चार्टर्ड अकाउंटंट आहेत.

जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल आणि मेडिकल रिसर्च सेंटरच्या स्थापनेपासून त्यांचे सक्रिय आणि मोठे योगदान आहे. तसेच नगरमधील अनेक सामाजिक व व्यावसायिक संस्थांमध्ये ते सक्रिय योगदान देत आहेत. नवी दिल्ली येथील अत्यंत महत्त्वाच्या डायरेक्ट टॅक्स कमिटीवर निवड झाल्याबद्दल, बँकेचे संचालक मंडळ, सीए संस्था, व्यावसायिक, मित्रपरिवार आणि संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नीट परीक्षेत हर्ष आहेरने ५८५ गुणांसह देशात मिळवला १५५१३ वा क्रमांक



नगर – सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेचे रहिवासी मिलिंद दिलीप आहेर यांचे सुपुत्र हर्ष आहेर याने वैद्यकीय शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या नीट–युजी २०२६ परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात ५८५ गुण मिळवत अखिल भारतीय स्तरावर १५५१३ वा क्रमांक मिळविला आहेश

अत्यंत स्पर्धात्मक असलेल्या NEET परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात मिळविलेला हा यशस्वी निकाल हर्षच्या मेहनतीचे, सातत्यपूर्ण अभ्यासाचे आणि ध्येयाप्रती असलेल्या चिकाटीचे द्योतक आहे. त्याच्या या यशामुळे आहिल्यानगर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, हर्षने जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल केले आहे.

हर्षच्या यशामागे त्याचे आई–वडील, कुटुंबीय तसेच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले. या यशामुळे त्याच्या वैद्यकीय क्षेत्रातील पुढील वाटचालीसाठी आशादायी सुरुवात झाली आहे. हर्ष आहेर याच्या या यशाबद्दल सिद्धिविनायक सोसायटीतील रहिवासी, मित्रपरिवार, नातेवाईक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# शहीद पतीच्या स्मृतिनिमित्त ‘बालघर’ला अनोखी मदत

नगर – शहीद पतीच्या स्मृतीदिना– निमित्त तपोवन रस्त्यावरील बालघर प्रकल्पाला अंजली बळवंत जवक यांनी अनोखी मदत केली. नवीन जागेत स्थलांतर झालेल्या बालघर प्रकल्पाच्या मैदानासाठी त्यांनी तीन ट्रक मुरूम दिला.

सावेडी येथील रहिवासी (मुळ रा.रांजणगाव मशीद, ता. पारनेर) असलेल्या अंजली जवक यांचे पती बळवंत सुखदेव जवक पाच वर्षांपूर्वी शहीद झाले. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त गरजूंना मदत करण्याचे त्यांनी ठरविले होते. त्यानुसार त्यांनी बालघर प्रकल्पाला मदत दिली. यावेळी अंजली जवक यांच्यासह आकांक्षा जवक, सामाजिक कार्यकर्त्या शितल दळवी, बालघर प्रकल्पाचे संस्थापक युवराज गुंड, सहायक रूक्मिणी ठोंबरे आदी उपस्थित होते. गरजू मुलांचा सांभाळ व संगोपन करणारी बालघर प्रकल्प ही संस्था नुकतीच पूर्वीच्या जागेजवळच स्थलांतरीत झाली. या ठिकाणी अनेक कामांसाठी निधीची गरज आहे, हे ओळखून जवक यांनी आपल्या पतीच्या स्मृतिदिनानिमित्त बालघरला तीन ट्रक मुरूमांची मदत केली.


**ग्रामपंचायत चासनळी, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर**
**बी–१ निविदा**

ग्रामपंचायत चासनळी ता.कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार, पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी –१ निविदा दरपत्रके मागविणेत येत आहे .

| अ . क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे चासनळी येथे गावठाण मध्ये रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | १ लक्ष | १५ वित्त आयोग सन २०२५–२६ | सु.बे |
| २ | मौजे चासनळी येथे गावांतर्गत पाईप लाईन व चेंबर बांधकाम करणे | १.५० लक्ष | १५ वित्त आयोग सन २०२५–२६ | खुला |

(काम पुर्ण करण्याचा कालावधी– ३ महिने)


अटी व शर्ती–१)निविदा फॉर्म माहिती पत्रक दि.२८/०७/२०२६ ते ०२/०८/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी–१ निविदा दि. ०३/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील. ३)निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे. निविदेसोबत–१) जि. प.नोंदणी २) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४)अनुभवाचा दाखला

**ग्रामसेवक/सरपंच**
**चासनळी, ता. कोपरगाव,जि.अहिल्यानगर**


# अहिल्यानगरमध्ये निसर्ग व पर्यावरणाशी एकरूप होणारा पारंपरिक ‘बागुल पंडुगा’ सण ३१ जुलै रोजी साजरा होणार

नगर – अहिल्यानगर येथे निसर्गाशी एकरूप होत पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण करण्याचा संदेश देणारा पद्मशाली समाजाचा पारंपरिक ‘बागुल पंडुगा’ सण यंदा ३१ जुलै रोजी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी यासंदर्भातील माहिती दिली असून, या सणाच्या माध्यमातून निसर्ग, पर्यावरण आणि मानवी जीवन यांचा अतूट संबंध अधोरेखित केला जात असल्याने समाजबांधवांनी या निमित्ताने वृक्षसंवर्धनाचा संकल्प करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

पद्मशाली समाजातील पूर्वजांनी भविष्यातील दूरगामी विचार करून निसर्गाचे संतुलन अबाधित राहावे, वृक्षसंपदा टिकून राहावी आणि मानवाने निसर्गाशी नेहमी एकरूप होऊन त्याचे संवर्धन व संरक्षण करावे, यासाठी विविध धार्मिक सण–उत्सवांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक संदेश दिला आहे. आषाढ महिन्याच्या पौर्णिमेनंतर येणाऱ्या पहिल्या शुक्रवारी ‘बागुल पंडुगा’ साजरा करण्याची शेकडो वर्षांची परंपरा आहे. आंध्र प्रदेश तसेच तेलंगणा राज्यातील जाणकारांच्या माहितीनुसार, या सणाची परंपरा साधारण २०० ते २५० वर्षांपासून सुरू आहे. तेलंगणातील आरमूर, मिठपेल्ली, कोरुटला, करीमनगर, निजामाबाद, सिद्धीपेठ, सिरसिल्ला, कामारेड्डी, दुब्बाका, येमूलवाडा तसेच हैदराबाद शहर व ग्रामीण भागातील पद्मशाली समाजबांधव हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. आषाढ महिन्यात पावसाळा सुरू झाल्यानंतर वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे विविध संसर्गजन्य आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे मानवाचे आरोग्य सुरक्षित राहावे,



संतुलित पर्जन्यवृष्टी व्हावी आणि पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये, या भावनेतून या सणाची परंपरा सुरू झाली आहे.

या पवित्र दिवशी निसर्गातील आद्यशक्ती मानल्या जाणाऱ्या लक्ष्मीदेवी (लच्छमम्मातल्ली) आणि शीतलादेवी (पोशम्मातल्ली) यांची भक्तिभावाने पूजा केली जाते. देवीला जलाभिषेक, पुष्प, दीप–धूप आरती करून गोड पुरी, भात, दहीभात, त्यावर ओवा–फुटाणे तसेच मेथीची भाजी असा पारंपरिक नैवेद्य दाखविला जातो. खण–नारळाने देवीची ओटी भरून पूजा केली जाते आणि या निमित्ताने देवीची यात्रा व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. पूर्वी हा सण बागेत अथवा वनराईमध्ये निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन साजरा करण्याची प्रथा होती. कुटुंबीय, नातेवाईक व समाजबांधव एकत्र येऊन निसर्गाच्या सान्निध्यात पूजा, नैवेद्य व भोजनाचा आनंद घेत असत, ज्यामुळे या सणाला धार्मिकतेसोबतच सामाजिक आणि पर्यावरणीय महत्त्वही प्राप्त झाले आहे.

मात्र, अलीकडच्या काळात शहरांचा झपाट्याने विस्तार होत असून, मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करून सिमेंट–कॉंक्रीटच्या इमारती उभ्या राहत आहेत. यामुळे शहरांच्या आसपासची हिरवाई आणि झाडी मोठ्या प्रमाणात कमी झाली असून, निसर्गाच्या सान्निध्यात बागेत जाऊन बागुल पंडुगा साजरा करण्याची पूर्वीची परंपरा हळूहळू लोप पावत चालली आहे. आता अनेक समाजबांधव हा सण आपल्या घरीच साजरा करतात. आजच्या काळात वृक्षतोडीला विरोध करून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे, लावलेल्या झाडांचे नियमित संगोपन व संरक्षण करणे ही जबाबदारी समाजाने स्वीकारली, तरच बागुल पंडुगा सणाचा खरा उद्देश साध्य होईल, असे मत सौ. स्वाती सिरसुल यांनी व्यक्त केले आहे.

या पार्श्वभूमीवर, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि उपमहापौर धनंजय जाधव यांच्या पुढाकारातून राबविण्यात येत असलेल्या ‘ग्रीन सिटी – झाडे लावा, झाडे जगवा’ या पर्यावरणपूरक उपक्रमाला समाजबांधवांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. केवळ वृक्षलागवड न करता लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन व संरक्षण करण्याची जबाबदारी स्वीकारण्यासोबतच, पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या व अन्य प्लास्टिक वस्तूंचा वापर टाळून पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली आहे.

अहिल्यानगर शहरात दोन ठिकाणी देवीची मंदिरे आहेत. तोफखाना भागातील मोची गल्ली येथील शीतलादेवी (पोशम्मा) मंदिर तसेच बालिकाश्रम रोडवरील जाधव मळा येथील लक्ष्मीआई (लच्छमा) मंदिरात बागुल पंडुगानिमित्त सकाळपासूनच महिला, पुरुष, देवीचे जागर करणारे पोतराज आणि डोक्यावर कलश घेऊन भक्तीभावाने वाजत–गाजत देवीची यात्रा निघते. अहिल्यानगरसह मूळ तेलंगणा राज्यातील पद्मशाली समाजबांधव आजही हा सण एकाच दिवशी साजरा करतात. मात्र महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, सोलापूर, नांदेड, जालना यांसह अन्य शहरांमध्ये पद्मशाली समाजबांधव ‘पोशम्मा पडुगा’ या नावाने आषाढ महिन्यात आपल्या सोयीनुसार, विशेषतः रविवारच्या सुट्टीच्या दिवशी हा सण साजरा करतात.

निसर्ग, पर्यावरण आणि कुटुंबाशी एकरूप होण्याचा संदेश देणाऱ्या या पारंपरिक सणानिमित्त पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल, समाजाच्या माजी अध्यक्षा सौ. शामला बोरा, तसेच रंजना क्यादर, लता पुलगम, नीता मंचे, विजया बोडके, शारदा सुंकी, रत्ना कोटा, रुक्मिणी संदूपटला, भारती सुरम, सोनाली दूडम, रेणुका गाली, पद्मा म्याना, ज्योती बिज्या, सारिका म्याना, ललिता बल्लाळ, स्वरूप कुचन, अंबिका बोगा, सोनी शामल, सुनीता कुरापट्टी आदी महिला कार्यकर्त्यांनी समस्त पद्मशाली समाज बांधव–भगिनींना बागुल पंडुगा सणाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

